आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २२ एप्रिल २०२३




कराभ्यां परशुं चापं
दधानं रेणुकात्मजं ।
जामदग्न्यं भजे रामं
भार्गवं क्षत्रियान्तकं ॥१॥
नमामि भार्गवं रामं
रेणुका चित्तनन्दनं

# भगवान परशुराम
## जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!


सौजन्य


मनीभावे शुद्ध खावे

प्रत्येक सणाचे खास - विशिष्ट खाद्यपदार्थ मिळण्याचे एकमेव ठिकाण

# भावे आणि कंपनी

| कुंभारवाडा | एन-5 सिडको | उल्कानगरी | पीरबाजार |
|---|---|---|---|
| 9850019109 | 9325212390 | 9156302562 | 8830757817 |

आमची नवीन शाखा : हॉटेल विट्समोर, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, मो. 8888882709





# आणिक स्मृती ठेवुनी जाती...

आधुनिक केसरी

एके दिवशी सकाळी सहा वाजताच फोन वाजला. एवढ्या सकाळी कोणाचा फोन पाहावं म्हटलं तर तो फोन होता माझे मित्र राजेंद्र चिमणपुरे यांचा. एवढ्या सकाळी काय महत्वाचे असावे असे वाटून मी फोन घेतला. म्हणाले, ' सर, आस्था चॅनल लावा. रामदेवबाबा पोटाच्या तक्रारींवर योगासने आणि औषधे सांगताहेत. सकाळी पाच पासूनच आस्था चॅनलवर त्यांचे मार्गदर्शन सुरु असते. ' ही माहिती मला नवीन होती. एवढ्या सकाळी उठून मी कधी टीव्ही पाहिला नव्हता. एवढ्या तळमळीने आणि आठवणीने फोन करणारा प्रेमळ मित्र दुर्दैवाने आता या जगात नाही. कधी कधी आपल्या एखाद्या जिवलग मित्राचे असे अचानक अकाली निघून खूप वेदनादायी असते. आपले एखादे जवळचे नातेवाईक गेल्याचे जेवढे दुःख असते, तेवढेच दुःख अशा प्रसंगी होते. तसंच मला या प्रसंगी झालं. आम्ही सगळेच माझ्या या प्रेमळ मित्राला आदराने आणि प्रेमाने ' दादा ' म्हणून हाक मारायचो. दादांची मूर्ती लहान होती. जेमतेम पाच फूट उंची असेल. पण त्याच्या कर्तृत्वाची उंची भल्याभल्यानाही लाजवणारी होती. परमेश्वर काही व्यक्तींच्या बाबतीतही काहीतरी उणे ठेवतो. तशी दादांना बेताची उंची, किरकोळ शरीरयष्टी लाभली होती. हे कमी की काय म्हणून दमा सोबतीला एखाद्या सावलीसारखाच राहायचा. पण त्याच परमेश्वराने त्यांना दुर्दम्य इच्छाशक्ती, विनोदबुद्धी यासारख्या गुणांचे दान त्यांच्या झोळीत टाकले होते. आपल्या शारीरिक आणि आर्थिक अशा विपरीत परिस्थितीत या माणसानं नियतीपुढे हार मानली नाही. त्याने जिद्दीनं झुंज तर दिलीच पण दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर सामान्यातला सामान्य माणूस काय करू शकतो हे दाखवून दिले. तो अनेकांना जगणे शिकवून गेला. दादा म्हणजे आमच्या हायस्कुलमधील विद्यार्थीप्रिय शिक्षक. जिथे भल्याभल्याना हातात छडी घेऊन शिकवावे लागे, तिथे दादांच्या केवळ बोलण्याने विद्यार्थी शांत होत. प्रत्येकाच्या जवळ जाऊन ते त्या विद्यार्थ्यांची आस्थेने चौकशी करीत. तो विद्यार्थी आर्थिक अडचणीत असेल तर त्याला शक्य ती मदत करीत. एवढी मदत करणारे हे दादा परिस्थितीने खूप श्रीमंत होते का ? तसं अजिबात नव्हतं. दादांचं जीवनच कष्टातून घडलं होतं. त्यांचे वडीलही शिक्षकच होते. त्यांचे आजोबाही शिक्षक होते. असा तीन पिढ्यांचा घरात शिक्षकाचा वारसा. आई खूप लवकर हे जग सोडून गेली होती. पाच बहिणी आणि दोन भावांचं हे कुटुंब होतं. **क्रमशः**





# आनंदी पहाट

## व्हर्चुअल नाती खरोखरीच टिकतात का ?

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या जन्मापासूनच आपलं स्वतंत्र अस्तित्व निर्माण झालेलं असतं. आपलं स्वतःचं आयुष्य प्रत्येकजण आपापल्या पिंडानुसार व्यतीत करत असतो. आपल्या आवडी-निवडी, विचार-आचार, उठणे-बसणे, चालणे-बोलणे, हसणे-रुसणे हे सर्व काही इतरांपेक्षा नेहमीच भिन्न असतं. प्रत्येकाचा पिंड निराळा असतो, जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती. आपलं स्वातंत्र्य अबाधित राहावं असंही अनेकांना वाटत असतं, ते स्वाभाविकच आहे. आपल्या वक्तृत्वामुळे, नेतृत्वामुळे आणि कर्तुत्वामुळे प्रत्येकाची ओळख होत असते. काही जणांची ओळख त्यांच्या दातृत्वामुळे, मातृत्वामुळे किंवा पितृत्वामुळे होत असते. यांपैकी आपलं व्यक्तिमत्व कोणत्याही कारणांमुळे स्वतंत्र अस्तित्व बनवत असलं तरीही त्या व्यक्तिमत्वाची नाळ कोणा-ना-कोणाशीतरी जोडलेली असते. व्यक्ती म्हणून कितीही स्वतंत्र अस्तित्व असलं तरीही शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक पातळीवर कोणतीही व्यक्ती एकट्यानं जीवन आनंदी करू शकतेच असं नाही. प्रत्येकाला कोणाची का होईना पण साथ, सोबत, संगत हवी असतेच. शरीरानं जसं फार काळ कोणी एकटं राहू शकत नाही, तसंच मनानं देखील एकलेपण अधिक काळ सुखावह ठरत नाही. हल्लीच्या व्हर्च्युअल जमान्यात संवाद आणि सहवास दोन्हीही इतिहासजमा होत चाललं आहे. संवाद होतो म्हणा तसा, पण व्हर्च्युअल पद्धतीने, प्रत्यक्ष भेटून अथवा फोनवर बोलूनही नाही, तर व्हॉटस्ॲपद्वारे. त्यामुळे सहवासाचा तर प्रश्नच येत नाही. दिवसेंदिवस निर्माण होत जात असलेल्या या दुराव्याला रक्ताच्या नात्याचा ओलावा राहण्याची शक्यता कमी होत असल्याचं जाणवतं. अशावेळी बादरायण संबंधांचा तर विषयही मनाला स्पर्श करण्याचं कारण नाही. या व्हर्च्युअल जमान्यानं खरंच नाती संपवली आहेत का ? एक काळ असा होता, जिथे नव्यानं नाती निर्माण केली जायची. काही वेळा तर ती रक्तापलीकडची असून सुद्धा अधिक घट्ट असायची.



आधुनिक केसरी

**जन्माचे सार्थक | संत संग ||**
**करावा शेजार | पाहुनी सज्जन ||**
**टाळावा दुर्जन | क्षणोक्षणी ||१||**
**पारखून घ्यावा | सद्गुण दुजांचा ||**
**दुर्गुण स्वतःचा (मनाचा)| सोड आधी ||२||**
**निष्काम कर्माचा | वाढु दे पसारा ||**
**सात्विक सोयरा | भेटो मज ||३||**
**कळावी महती | भक्तीच्या शक्तीची ||**
**दांभिक वृत्तीची | होळी व्हावी ||४||**
**आता कळो आले | साधक-बाधक ||**
**जन्माचे सार्थक | संत संग ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**नीलाक्षीं त्वां विशालाक्षींवस्त्रं निशानभधृताम् ।**
**शोभितं तारकाभिस्तत्दिव्यं कान्तियुतं तथा ।।२।।**
**नीलाक्षी, विशालाक्षी, रात्रीच्या आकाशाप्रमाणे तारकांनी सुशोभित, दिव्य, कान्तीयुक्त नील वस्त्र धारण करणाऱ्या अशा तुला मी वंदन करतो.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**ऐसा दृढ़ संकल्प हो, कोटि विघ्न यदि आय । तभी विकल्प न हो सके, पूरण पूरण पाय ।।४०।। (स्वर्वेद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय) ०५/०४/४०**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

असा दृढ संकल्प असावा की, कोटी विघ्ने आली तरीही पुरुषार्थ सोडू नये , कितीही कष्ट पडले किंवा अडचणी आल्या तरीही हाती घेतलेलं कार्य सोडून मागे हटू नये . पूर्ण पुरुषार्थी, महापुरूषच पूर्ण पुरुषाला म्हणजेच परमेश्वराला पूर्ण पणे प्राप्त करतात. ते कितीही कठीण प्रसंग आले तरीही आपल्या कार्यात विकल्प न करता म्हणजेच कार्य अर्धवट न सोडता कठीण पुरुषार्थाद्वारे आपला सत्यसंकल्प पूर्ण करतात.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

# देव असा ओळखावा!

आधुनिक केसरी


मित्रांनो मी तुम्हाला आठवत असेल की समासाच्या सुरवातीला मी म्हणाले आहे की,ज्याच्या सत्तेमुळे हे भव्यदिव्य विश्व,अनंत प्रकारचे जीवप्राणी,ज्याच्या अगाध कल्पनेने हे अपरंपार विश्व युगानंयुगे अखंड अबाधित राहुन नित्यनेमाने चालत आले आहे. ही एक अनामिक शक्ति आहे आणि त्यालाच आपण "देव"ही शक्ति मानतो ती संकल्पना मान्य करतो. ज्याच्या सत्तेने विश्वतील घडामोडी चालतात, ज्याच्या अस्तित्वाची जाणीव सतत आपल्याला होते तो दिसत नाही पण कायमचा सर्व कर्ता आहे,अशा त्रिभुवनाचा पालन कर्ता म्हणजे देव होय. आकाशातील चंद्र सुर्य,मेघमाला, आपण चंद्राचे टिपूर चांदण्या त आपल्याच भावविश्वात दंग होतो,व देवाचं अस्तित्व मान्य करतो.कोजागिरी या सणाला ज्या चंद्राचं प्रतिबिंब दुधात पडले तर त्या दुधाचे अम्रुत होते. त्याच देवाने रविमंडळात तेज ओतले, ज्याने सागराला मर्यादा घातली, ज्याने शेषाची स्थापना करून ही धरणी स्थिर केली आणि त्याच अनामिक शक्तिने म्हणजेच देवाने आकाशात अनंत तारका तयार केल्या. हे सर्व करण्यासाठी कर्ता करवीता जी शक्ति असते ती शक्ति म्हणजे देव होय. जीवप्राण्याचे चार प्रकार, वाणीचे चार प्रकार, प्राण्यांच्या चौऱ्यांशी लक्ष योनी, स्वर्ग, म्रुत्युव पाताळ हे तीन ज्याच्या सत्तेने निर्माण झाले त्यालाच आपण देव म्हणतो. ब्रम्हा, विष्णू, महेश हे खरे त्रिदेव आहेत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# प्रपंचातले सुखदु:ख हे केवळ जाणिवेत आहे

आधुनिक केसरी



प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारूतिरायाला सांगून चोरी करीत असे. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारूतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवेनकोपण, म्हणजे आपली वासना गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या श्वानाप्रमाणे आहे, त्याला नुसते हड्हड् करून ते बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच त्याला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ते देवघरात येते. बरे, चांगली वासना तेवढीच आत येऊ द्यावी असे म्हणावे, तर तिच्याबरोबर वाईट वासनाही हळूच आत येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही. वासना म्हणजे देवाच्या विरूद्ध असलेली आपली इच्छा .

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**मनुष्यदेहा ऐसा निध । साधिली ते साधे सिद्ध ॥ करूनि प्रबोध । संत पार उतरले ॥ध्रु.॥ नाव चंद्रभागे तीरीं । उभी पुंडलीकाचे द्वारीं ॥ कट धरूनियां करीं । उभाउभी पालवी ॥२॥ तुका म्हणे फुकासाठीं ।**

शनिवार, २२ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२२८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 22 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-228 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# साबरमती एक्स्प्रेस जाळणाऱ्या आठ जणांना जामीन मंजूर

## ज्या आरोपींना फाशी सुनावली होती त्या आरोपींनाच जामीन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली: गुजरातच्या गोध्रा येथे २००२ साली साबरमती एक्स्प्रेसला आग लावलेल्या आठ आरोपींची सर्वोच्च न्यायालयाने जामीनावर सुटका केली आहे. या प्रकरणातील आरोपी जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. १७ ते २० वर्षे या आरोपींनी शिक्षा भोगली आहे. तर, चार आरोपींची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. धक्कादायक म्हणजे ज्या आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती त्या आरोपींनाच जामीन मंजूर करण्यात आला आहे.**

गुजरात दंगलीप्रकरणी सत्र न्यायलायने मार्च २०११ मध्ये ११ आरोपींना फाशीची शिक्षा आणि २० जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. तर, अन्य ६३ आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती. परंतु, फाशीच्या शिक्षेविरोधात गुजरात न्यायालयात आव्हान देण्यात आले. २०१७ मध्ये गुजरात उच्च न्यायालायने ११ जणांची फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलली. त्यामुळे जन्मठेप भोगण्याऱ्यांची संख्या ३१ झाली. जन्मठेपेतून आरोपींना जामीन मिळावा याकरता २०१८ पासून याचिका दाखल होती. त्यावर आज निकाल लागला आहे. १३ मे २०२२ मध्ये न्यायालायने अब्दुल रहमान धंतिया उर्फ कानकट्टो याला सहा महिन्यांसाठी अंतरिम जामीन मंजूर केला होता. त्याच्या बायकोला कर्करोगाने ग्रासलं असून त्याच्या मुली मानसिकदृष्ट्या विकलांग असल्याने हा जामीन मंजूर करण्यात आला होता. ११ नोव्हेंबर २०२२ मध्ये न्यायालायने त्याचा हा जामीन अर्ज ३१ मार्च २०२३ पर्यंत वाढवला. तर, फारूक नावाच्या आरोपीने १७ वर्षांची शिक्षा भोगल्याने त्याच्या वर्तनानुसार जामीन मंजूर करण्यात आला आहे. जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आरोपींची १७ वर्षे शिक्षा भोगून झाली आहे. त्यांच्या वर्तनात सुधारणा दिसत आहेत. तसंच, याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकांवर लवकर सुनावणी होण्याची शक्यता नाही, या बाबी लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीस डी.वाय चंद्रचूड, न्यायाधीश पी. एस. नरसिंहा यांच्या खंडपीठाने आठ जणांना जामीन दिला. तसंच, न्यायालयाच्या अटी-शर्थींचेही पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, इतर चौघांनी केलेल्या याचिका सर्वोच्च न्यायालयने फेटाळून लावत त्यांच्या जामीन अर्जावर निकाल देण्यास नकार दिला आहे.

### आरोपींना निर्दोष सोडणे ही संविधानाची हत्या



गोध्रा जळीतकांडानंतर ( २००२ ) गुजरातमध्ये उसळलेल्या दंगलींमध्ये नरोडा पाटिया गावातील मुस्लिमांची घरे पेटवून देण्यात आली होती . या हल्ल्यात ११ लोकांचा मृत्यू झाला होता . या खटल्यात भाजपाच्या माजी आ .माया कोडनानी, बजरंग दलाचे नेते बाबू बजरंगी, विश्व हिंदू परिषदेचे नेते जयदीप पटेल हे प्रमुख आरोपी होते . यांच्यासह इतर ६९ जणांवरही गुन्हा दाखल करण्यात आला होता . या सर्वांची विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे . यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी टीकास्त्र सोडले आहे . कालच्या निर्णयामुळे देशात संविधानाचीही हत्या झाली, असे विधान शरद पवार यांनी केले . ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमात बोलत होते . नरोडा हत्याकांड प्रकरणावर न्यायालयाने दिलेल्या निकालावर भाष्य करताना शरद पवार म्हणाले, देशात दररोज काहीतरी घडते . आज एक बातमी आहे की, काही वर्षांपूर्वी गुजरातमध्ये अल्पसंख्याकांच्या हत्या झाल्या .



## ईद...!

रमजान महिन्यात
रोज उपवास केला,
इबादत करण्याचा
मनाला आनंद झाला.

चांदरातीला मेहेंदी
हाता-पायाला लावली,
रमजान ईदसाठी
नवे कपडे शिवली.

राती आईने तळले
भजे आणि गुलगुले,
ती खाऊन आनंदली
सारी मुली आणि मुले.

ईदगाहमध्ये सारे
नमाज पढु लागले,
एकमेकास ईदीच्या
शुभेच्छा देऊ लागले.

आब्बाजान ने आणले
सुखामेवा आणि दूध,
शिरखुर्मा पाजुनिया
साजरी होतेया ईद.

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

# नाशिकमध्ये अनेक ठिकाणी आयकरचे छापे

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहरातील १५ पेक्षा अधिक बांधकाम व्यावसायिक, त्यांच्याशी संबंधित महत्वाच्या व्यक्ती, कार्यालये या ठिकाणी आयकर विभागाने गुरूवारी सकाळी अचानक छापे टाकले.




या कारवाईने बांधकाम क्षेत्रात खळबळ उडाली आहे. आयकर विभागाच्या दिल्ली, मुंबई, पुणे येथील पथकासह अधिकारी, कर्मचारी असे ७५ हून अधिक जण या कारवाईत सामील आहेत. कारवाई सुरू असलेल्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरात क्रेडाईसह अन्य काही बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनांनी गृह महोत्सव भरवला. या महोत्सवाची माहिती देण्यासाठी तयार करण्यात आलेले प्लास्टिक फलक आदिवासी भागात घरांवर छप्पर तसेच अन्य कामासाठी वापरण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक कामांसाठी संघटना प्रयत्नशील असून सामाजिक बांधिलकी जपत काम सुरू असल्याचा दावा करण्यात येत आहे. दुसरीकडे, बहुतांश बांधकाम व्यावसायिक करचुकवेगिरी करत असल्याच्या संशयातूनच गुरूवारी १५ बांधकाम व्यावसायिकांची निवासस्थाने, कार्यालय, त्यांच्याशी संबंधित वकील, व्यवस्थापक यासह अन्य ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. छाप्यात गंगापूर रोड, कुलकर्णी गार्डन यासह अन्य भागातील नामांकित बांधकाम व्यावसायिकांचा समावेश आहे. यातील काही बांधकाम व्यावसायिक महापालिकेच्या विकास कामांचे बांधकाम करत आहेत. कारवाई नेमकी अघोषित संपत्तीच्या चौकशीसाठी की करचुकवेगिरी तपासण्यासाठी झाली, हे स्पष्ट झालेले नाही. कारवाईत बांधकाम व्यावसायिकांकडील कागदपत्रांची छाननी, बँक खात्याचा तपशील आदी माहितींची पडताळणी सुरू असून सायंकाळपर्यंत ही कारवाई सुरू राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# गुंतवणुकीच्या आमिषाने १६ कोटींची फसवणूक




आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** गुंतवणुकीवर जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून शेकडो गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला असून १६ कोटी ३१ लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी एपीएस वेल्थ व्हेंन्चर्सच्या संचालकांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणुकीची व्याप्ती मोठी असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. याबाबत डॉ. जयदीप शंकरराव जाधव ( वय ५० रा. कस्पटे वस्ती रस्ता, वाकड ) यांनी चतुःशृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी एपीएस वेल्थ व्हेंचर्स एलएलपी या कंपनीचे संचालक अविनाश अर्जुन राठोड, त्याची पत्नी विशाखा अविनाश राठोड ( रा. आनंदबन सोसायटी, रावेत ) यांच्यासह अन्य संचालकांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

आरोपींनी डॉ. जाधव यांना एपीएस वेल्थ व्हेंन्चर्स एलएलपी या कंपनीत गुंतवणूक केल्यास जादा परतावा देण्याचे आमिष दाखविले होते. डॉ. जाधव यांनी ८६ लाख रुपये आणि त्यांच्या नातेवाईकांनी १५ कोटी ४५ लाख रुपयांची गुंतवणूक आरोपींनी सांगितलेल्या वेगवेगळ्या योजनेत केली होती. आरोपींनी जादा परताव्याचे आमिष दाखवून करार करुन घेतला होता. आरोपींनी परतावा न देता फिर्यादी डॉ. जाधव यांच्यासह गुंतवणुकदारांची सुमारे १६ कोटी रुपयांची फसवणूक केली. आरोपींनी अशा प्रकारे शेकडो गुंतवणूकदारांची फसवणूक केली असून फसवणुकीची व्याप्ती मोठी असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.



## मन की बात

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या बहुचर्चित कार्यक्रमाचा 100 वा भाग लवकरच प्रसारित होणार आहे. हा भाग खूपच खास असणार आहे. 100 व्या भागानिमित्त सरकारने 100 रुपयांचे नाणे जारी करण्याचा निर्णय घेतला आहे. एप्रिल महिन्याच्या शेवटच्या रविवारी म्हणजेच 30 एप्रिल 2023 रोजी 'मन की बात' या लोकप्रिय कार्यक्रमाचा 100 वा भाग प्रसारित होणार आहे. हा भाग प्रसारित करण्यासाठी भारतीय जनता पार्टी खूप मेहनत घेत आहे. एक लाखापेक्षा अधिक मंडळींना बूथवर 100 वा भाग ऐकता येईल यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. रजत, तांबे, निकिल आणि जस्ता या चार धातूंपासून हे 44 मिलीमीटरचे 100 रुपयांचे गोलाकार नाणं बनवण्यात आले आहे. नाण्याच्या पुढील बाजूस अशोक स्तंभ असणार आहे. त्याच्या खाली 'सत्यमेव जयते' असे लिहिलेले असेल. डाव्या बाजूस देवनागरीमध्ये 'भारत' तर उजव्या बाजूला इंग्रजीमध्ये 'India' असे लिहिलेले आहे. नाण्याच्या मागच्या बाजूला 'मन की बात'च्या 100 व्या भागाचे प्रतिक असलेले खास चिन्ह असणार आहे. मायक्रोफोनचे चित्र आणि त्यावर 2023 असे लिहिलेले असेल. तसेच या चित्राच्या वरच्या बाजूला देवनागरीमध्ये 'मन की बात 100' आणि इंग्रजीत 'Mann Ki Baat 100' असे लिहिण्यात आले आहे. नरेंद्र मोदी यांनी याआधीदेखील माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या स्मृतिदिनानिमित्त सलग चार वर्षांसाठी 100 रुपयांचे नाणे जारी केले होते. तसेच नरेंद्र मोदी यांनी राजमाता विजयाराजे सिंधिया यांच्या जन्मशताब्दीनिमित्तदेखील 100 रुपयांचे नाणे जारी केले होते. तसेच महाराणा प्रताप यांच्या 476 व्या जयंतीनिमित्त 100 रुपयांचे नाणे जारी करण्यात आले होते. 2010, 2011, 2012, 2014 आणि 2015 सालीदेखील 100 रुपयांचे नाणे जारी करण्यात आले होते. नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या 100 व्या भागाची देशभरात चर्चा आहे. तसेच परदेशातदेखील या कार्यक्रमाचे प्रसारण होणार आहे. 100 व्या भागात 'पद्म भूषण' आणि 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या दिग्गजांचा सन्मान करण्यात येणार आहे. या 100 व्या भागाची देशासह परदेशातदेखील चांगलीच चर्चा रंगली आहे.

## श्रेयवादात अडकलेली आंबेडकरवादी चळवळ



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरानंतर आंबेडकरवादी चळवळीला योग्य असा नेता मिळालाच नाही. हे सत्य आहे व समाजाची शोकांतिकाही. आंबेडकरवाद हा जाती-धर्माशी मर्यादेत नसून, तो सामाजिक समता व सामाजिक न्यायावर आधारित आहे. आंबेडकरवादी चळवळीला आज जर बघितले तर एकाच वर्गाकडे आलेली आहे. किंवा धर्मांतर आंबेडकरांचा स्वीकार फक्त बौद्धांनीच केला. इतरांनी बाबासाहेब समजून घेऊन बाबासाहेबांच्या नावे समाजकारण व राजकारण करणे टाळले परंतु बौद्ध समाजाने बाबासाहेबांना डोक्यावर घेऊन समाजकारण, राजकारण करायला सुरुवात केली.**

पहिली गोष्ट बाबासाहेबांना एकाच जातीमध्ये बंद करणे आणि त्याच जातीने किंवा धर्माने बाबासाहेबांची चळवळ चालवणे हेच आंबेडकरवादी चळवळीचे सर्वात मोठे अपयश आहे. दुसरा आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न बाबासाहेबांनंतर समाजाला सामाजिक व राजकीय खरा नेता मिळालाच नाही. आज जे ही आहे ते सध्याच्या नेत्यांमुळे नसून फक्त बाबासाहेबांमुळेच आहे. ही वस्तुस्थिती सुद्धा नाकारता येत नाही. बाबासाहेबांनंतर बाबासाहेबांची चळवळ अनेक गटातटामध्ये विभागले गेली, याचाच परिणाम समाजाची ताकद कमी होऊन समाजावर झालेले अन्याय अत्याचाराला न्याय देऊ शकले नाही. त्यामध्ये रमाईनगर हत्याकांड, खैरलांजी, भीमा कोरेगाव हे फक्त उदाहरणादाखल आहेत. अशा अनेक अत्याचाराला आंबेडकरवादी चळवळ न्याय देऊ शकले नाही किंवा ती बाजू उचलून धरू शकले नाही हे सर्वात मोठे अपयश म्हणावे लागेल. मुळात मुद्दा हा आहे एकट्या बाबासाहेबांनी स्वतः उभी केलेली चळवळ संपूर्ण भारतभर पसरली व संपूर्ण भारतातील शोषित, पीडित आणि मागास लोकांना न्याय सुद्धा मिळवून दिला. एका बाबासाहेबांनी करोडो लोकांची जीवन समृद्ध व सुखमय केले. परंतु त्याच बाबासाहेबांच्या जातीत बाबासाहेबांचे नाव घेऊन चळवळ करणारे अनेक लोक आहेत. अनेक लोक असुन सुद्धा एकाही सामाजिक अन्याय अत्याचाराला न्याय मिळत नसेल तरी चळवळ व चळवळीचे नेतृत्व अपयशीच ठरले, हे सर्वांना मान्य करावे लागेल. बाबासाहेबांच्या नंतर बाबासाहेबांच्या विचाराचा, बाबासाहेबांच्या चळवळीचा अर्थ आपापल्या सोयीनुसार काढून स्वतःचे पोट भरण्याची दुकान सुरू करण्यात आले आहे. आपली दुकानदारी चांगली चालावी हाच प्रत्येकाचा उद्देश आहे. छोट्या छोट्या गोष्टीसाठी आंदोलने करणे उपोषणे करणे आणि त्या छोट्या गोष्टीचे काम सरकार कडून झाले तर त्याचे सर्व श्रेय स्वतःकडे घेऊन, त्याचा गाजावाजा करणे एवढेच काम आंबेडकरवादी चळवळीला राहले आहे अर्थात सर्वजण असे करतात असे नाही जे समाजातील अन्याय अत्याचार याविरुद्ध आवाज उठवून समाजामध्ये जनजागृती करतात व हे काम कोणत्याही स्वार्थाशिवाय करतात त्या सर्व मान्यवरांची मानावे तेवढे आभार कमीच आहेत. परंतु बहुसंख्य लोक चळवळीच्या नावाखाली कोणतेही काम न करता श्रेय लाटण्याचे काम करत आहेत. एखाद्या आंदोलनाला भेट दिली, एखाद्या आंदोलनामध्ये तास दोन तास बसले, आणि ते आंदोलन यशस्वी झाले तर त्या आंदोलनाला यशस्वी करण्यामागे माझाच कसा हात आहे. हे मीच ओरडून सांगण्याची वेळ आंबेडकरवादी चळवळीतील लोकांवरती आलेली आहे. मी तिथे बसलो म्हणून न्याय मिळाला या अविर्भावात राहणारे लोक चळवळीमध्ये आले, आणि म्हणून चवळवळ श्रेयवादात अडकली गेली. आणि सामाजिक न्यायापासून दूर राहावे लागले याची जाणीव लोकांना राहिली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सांगून सुद्धा हे लोक ऐकत नसतील तर हे बेगडी आंबेडकरवादी व पोटभरू लोक आहेत चळवळीचे शिलेदार नाही हे लक्षात घ्यावे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलं होतं शिका, संघटित व्हा आणि मग संघर्ष करा परंतु बाबासाहेबांच्या नंतर हजारो नेते हजारो संघटना तयार झाल्यात. आणि प्रत्येकाला असेच वाटते मीच सर्व काही करू शकतो, मीच न्याय देऊ शकतो, मीच व्यवस्था बदलू शकतो, आणि म्हणून स्वतःच्या प्रसिद्धीसाठी वेगवेगळे राहून स्वतःच्या दुकानाचे अस्तित्व टिकवण्याचा निरागस प्रयत्न चालू आहे. जगातील सर्वात विद्वान व चळवळीमध्ये फुल टाईम काम करून समाजाला न्याय हक्क बहाल करणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संघटित झाल्याशिवाय, एकत्र आल्याशिवाय आपण आंदोलन किंवा चळवळ चालवू शकणार नाही, न्याय मिळवू शकणार नाही असे सांगितलेले असुनही जर स्वतःची दुकानदारी सुरू केलेले लोक बाबासाहेबांची चळवळ चालवण्याच्या लायक आहेत का हा प्रश्न मात्र निर्माण होतो. नामांतर चळवळीमध्ये सर्वजण एकत्र लढले नेतृत्वाचा, व श्रेयवादाचा कोणताही विचार न करता ध्येयासाठी लढलेत, त्यावेळी त्यांनी नेते म्हणून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढून समाजामध्ये जन जागृती करून नामांतरण आवाज महाराष्ट्रामध्ये बुलंद केला. हे त्यांचे कार्य गौरव करण्या लायक आहे. परंतु आंदोलनामध्ये अनेक तरुण तरुण शहीद ध्येयसाठी शहिद झाले. जगणाऱ्यापेक्षा मरणारे श्रेष्ठ असतात आणि म्हणून मरणाऱ्याच्या जोरावर जगणाऱ्यांनी नामांतराचा लढाई यशस्वी लढली. सामाजिक ऐक्याचा व सामाजिक आंदोलनाचा चांगला परिणाम होऊ शकतो हे नामांतर लढ्यामध्ये आपण बघितले. परंतु नंतर सर्वजण वेगवेगळे झाले. आणि नामविस्तार दिन वेगवेगळ्या स्टेजवर साजरा व्हायला लागला. मुळात नामविस्तार दिन वेगवेगळ्या स्टेजवर साजरा करणे येथेच आंबेडकरवादी चळवळ अपयशी झाली हेच दिसून येते. नामांतर आंदोलनातून मिळालेला विजय हा कोणत्याही एका नेत्याचा नसून तो समाजातील एकीकरणाचा व शहिदांच्या बलिदानाचा आहे ही गोष्ट नामांतरणदिन साजरा करून आपण विसरत असू, तर याचाच अर्थ नामांतरणाच्या लढ्याचे श्रेय एकट्याच्या खांद्यावर घेण्याची भूमिका प्रत्येकाची दिसत आहे. वरिल फक्त उदाहरण आहे अशा अनेक बाबी आहेत ज्या मधून आंबेडकरवादी चळवळीमध्ये सक्रिय असलेले कार्यकर्ते व नेते त्या आंदोलनाचे श्रेय स्वतःकडे घेण्याचे स्पर्धेमध्ये असतात. समजा एखाद्या ठिकाणी एक आंदोलन काही दिवसापासून सुरू आहे. पाच दहा मिनिटे तिथे जाऊन बसायचे, किंवा तास- दोन तास ही तेथे बसून भाषण देतात, आणि जेव्हा न्याय मिळाला त्यावेळेस माझ्यामुळे न्याय मिळाला असे श्रेय स्वतःकडे वळवून घेतात. शेकडो संघटना आहेत एखादा सामाजिक प्रश्नाचे असेल तर शेकडो संघटना एकत्र कधीच जात नाहीत. जर शेकडो संघटना एकत्र गेल्या तर समाजाची ताकद दिसून येईल व समाजाला न्याय लवकर मिळेल. परंतु समाजाला न्याय मिळो की न मिळो परंतु माझं अस्तित्व माझे नाव मिळायण्यासाठी चढाओढ सुरू असते. आंदोलन कोणा एकामुळे कधीच यशस्वी होऊ शकत नाही तरीही, आंदोलनामध्ये एकटे जाऊन भेटून येणारे लोक एक तर चळवळीला मागे आणतात आणि आंदोलनाची ताकद कमी करत असतात. याची जाणीव लोकांना नाही. एखाद्या सामाजिक समस्येसाठी किंवा सामाजिक न्यायासाठी एखाद्या ठिकाणी जर आंदोलन चालू असेल तर सर्व सामाजिक संघटनांना ज्या सामाजिक संघटना आंबेडकरवादी आहेत, बाबासाहेबांचं नाव घेतात, अशा लोकांना सामाजिक प्रश्नासाठी एकत्र जाणे का जमत नसेल? एकत्र गेल्यानंतर खरच न्याय मिळणार नाही का? एकत्र जर आलो तर न्याय मिळू शकतो हे नामांतर लढ्यात सिद्ध होऊन देखील, आज आम्हाला सामाजिक समस्या सोडवायचे नाहीत पण श्रेय मात्र स्वतःकडे घ्यायचे आहे म्हणून हा सगळा खटाटोप सुरू असतो. आंदोलनाला भेट देऊन आल्यानंतर त्याची श्रेय स्वतःकडे घेणाऱ्यामुळेच आंबेडकरी समाजाच्या समस्या अजून वाढलेले आहेत. आपापसातील ववैयक्तिक हेवी दावे, वैयक्तिक वाद व श्रेयवाद यामुळे आंबेडकरवादी चळवळ मागे येत आहे. जर कुणाला असे वाटत असेल की माझ्यामुळे अमुक आंदोलनाला न्याय मिळाला, तमुक आंदोलनामध्ये माझा सहभाग होता म्हणून नाही मिळाला, अशी जर कोणाचे धारणा असेल तर त्यांनी ती डोक्यातून काढून टाकावी. आणि तुमच्यामुळे न्याय मिळू शकतो हे सिद्ध करण्यासाठी तुम्ही समाजाला सामाजिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. 70 वर्षामध्ये संविधानाचा कलम क्रमांक एक सुद्धा लागू झालं नाही. आणि या आंदोलनामध्ये मी सहभाग घेतल्यामुळे किंवा माझ्यामुळे आंदोलन यशस्वी झाले म्हणणाऱ्यांनी कलम क्रमांक एकचे उलंघण होते म्हणून कधीच आंदोलनाला बसले नाही. किंवा कलम क्रमांक एकचे उलंघण करणाऱ्या लोकांना अडवले नाही. हि साधी गोष्ट जर आमच्याकडून होत नसेल तर, आंदोलनाचे श्रेय घेणे केवळ बाल बुद्धीचे लक्षण होय. तुमच्याकडे ताकत असेल तर अनेक गोष्टी अजूनही प्रलंबित आहेत. त्या गोष्टी ला न्याय देण्यासाठी आंदोलनाला का बसत नाही? तुमच्या बसल्याने जर न्याय मिळते अशी तुमची धारणा असेल तर तुम्ही कलम क्रमांक एक पालन व्हायला पाहिजेत म्हणून आंदोलनाला बसायला पाहिजेत, सरकारी नोकरीचे खाजगीकरण केलं ते थांबवण्यासाठी आंदोलन करायला पाहिजेत, देशाचे सार्वजनिक मालमत्ता विकून भांडवलदारांच्या घशात टाकत आहेत तेव्हा आंदोलन करायला पाहिजेत, भिमाकोरेगाव चे दंगलखोर बाहेर फिरत आहेत तेव्हा का आंदोलन करून समाजाला न्याय मिळवून देत नाहीत. अशा अनेक गोष्टी आहेत ज्या अत्याचाराच्या व मानव हिताच्या विरोधात आहेत. मग ज्या कोण्या एकट्याच्या बसण्याने न्याय मिळत असेल तरी वरील गोष्टीला न्याय मिळण्यासाठी का बसत नसतील? सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. आंबेडकरवादी समाजातील नेत्यांना स्वतःची पाठ स्वतःहून थोपटून घेण्यात, स्वतःची दुकानदारी सुरू करून त्यातच धन्यता मानण्याचा छंद झाला आहे. चळवळीचे वाटोळं झाला तरी चालेल परंतु माझे दुकानदारी बंद होऊ नये, म्हणून त्याची वळवळ सुरू असते. न्याय हा एकट्याने मिळत नाही, म्हणून सामाजिक न्याय मिळवायचा असेल तर सर्वांनी एकत्र येणे व श्रेयवाद सोडून देणे, हाच सर्वात मोठा व प्रभावशाली उपाय आहे. बर हा श्रेयवाद घेण्यासाठी कमी शिकलेले लोकच समोर आहेत असे मुळीच नाही. स्वतः ला उच्चशिक्षित समजणारे लोक सुद्धा श्रेयवाद घेण्यासाठी हापापलेले असतात. कोणतेही कर्म न करता त्यांच्या गळ्यात हार व नावाला प्रसिद्ध मिळायला पाहिजेत हीच त्यांची अपेक्षा असते. आपण शिकलो हे दाखवण्यासाठी कागद दाखवण्याची गरज नसायला पाहिजेत. आपले वागणे आपले, बोलणे, आपले विचार या गोष्टी मधून आपण शिक्षित आहोत हे सिद्ध व्हायला पाहिजे. परंतु आजची परिस्थिती बघितली तर त्यांना आपण उच्चशिक्षित म्हणतो ते बुद्धीचा विकास झालेला नाही असे असल्यासारखे आपापसात भांडत असतात. प्रतिक्रिया देत असतात. यामधून स्वतःची विद्वत्ता स्वतःचे शिक्षण घरातील संस्कार हे सुद्धा गोष्टी दिसून येतात. परंतु त्याची कोणतीही परवा न करता हे लोक श्रेयवादाच्या नादात आपण शिकलेले आहोत, कोणते शब्द कशा पद्धतीने वापरायला पाहिजेत, याचे भान हरवून फक्त आणि फक्त श्रेयघेण्याचे व एकमेकांवर शब्दांची मर्यादा ओलांडून टिकाटीप्पणी करण्याचे काम करतात तेव्हा त्यांच्या शिक्षणाची किव बुद्धीची येते. कर्म सोडून श्रेय मिळवण्याच्या नादात मुळ परिस्थिती बाजूला जाऊन नविन प्रकरण तयार होते. आणि चळवळ तेथेच अडकून बसते.

## रात्री झोपताना मोबाईल दूर ठेवणे हिताचे!



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आधुनिक केसरी

**अलिकडच्या काळात मोबाईल शिवाय माणसाचे जगणे असह्य होऊन गेले आहे. मोबाईलशिवाय त्याला करमतच नाही.अशी अवस्था झाली आहे.मोबाईलच्या बाहेर सुद्धा जग आहे हे तो विसरून गेला आहे.अति तिथे माती याप्रमाणेच सोशल मिडीयाचे झाले आहे. आपण मोबाईलच्या ईतक्या आहारी गेलो आहोत की अक्षरशा वेडे पिसे करून टाकले आहे. बऱ्याचदा रात्री झोपण्यापूर्वी लोक मोबाईल चेक करत असतात .किंवा एखादा फोन अर्जंट येईल यामुळेसुद्धा काहीजण मोबाईल उशीजवळ ठेवतात. तर ही सवय हानिकारक आहे.**



सतत मोबाईल जवळ ठेवल्याने मोबाईल मधुन रेडिओ फ्रिक्वेन्सी निघत असतात. ज्या शरीरासाठी अत्यंत घातक आहे. फोनमधून येणार्या लहरींमुळे मेंदूवर परिणाम होतो. अल्झामर सारखे विकार होतात. कर्करोग होण्याचा धोका वाढतो. अनिद्रा व मानसिक आजार बळावतात.ताणतणाव वाढतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०११च्या संशोधनात मोबाईल उशीखाली ठेवून झोपल्याने अडथळा निर्माण होऊ शकतो. मोबाईलच्या ब्लू लाईटमुळे डोळ्याला त्रास होतो.

झोपेमध्ये व्यत्यय येतो. ज्यांना मोबाईल जवळ ठेवून झोपण्याची सवय आहे त्यांनी डाटा प्लॅन बंद करुन झोपावे.किंवा तीन चार फुट अंतरावर मोबाईल ठेवावा. आज मोबाईल वापरणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे पण खबरदारी घेताना कोणी दिसत नाही.अगदी छोट्या छोट्या गोष्टी आहेत पण आपण त्याकडे दुर्लक्ष करतो.होता येईल तितका मोबाईल दुर ठेवणे फायदेशीर आहे.शेवटी आपले आरोग्यहीत महत्वाचे आहे.त्यासाठी रात्री झोपताना मोबाईल दुर ठेवणे हिताचे आहे. आजकाल मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग झाला आहे. कोरोना आणि लॉकडाऊननंतर वर्क फ्रॉम होम आणि ऑनलाईन स्कुलमुळेतर घरातील प्रत्येकाच्या हातात सतत मोबाईल असतो. काही जणांना तर मोबाईलची सवय इतकी असते की ते झोपताना मोबाईल त्यांच्या उशीजवळ ठेवून झोपतात. जाणून घ्या या सवयीचे काय तुमच्या शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतात. मोबाईल फोनमधून सतत रेडिओ फ्रिक्वेंसी निघत असतात. ज्याचा तुमच्या मेंदू आणि शरीरावर वाईट परिणाम होतो. काही संशोधनात यामुळे गंभीर आजार होत असल्याचे आढळून आले आहे. मोबाईलच्या अती वापरामुळे रात्री झोपूनही तुम्हाला दिवसभर थकवा, अशक्तपणा आणि निरूत्साही वाटू शकते. फोनमधून येणाऱ्या या हानिकारक लहरींचा तुमच्या मेंदूवर परिणाम झाल्यामुळे अल्झामरसारखे विकार होऊ शकतात. मोबाईल पाहत रात्री झोपल्यामुळे तुम्हाला शांत झोप लागत नाही ज्यामुळे तुमच्या मेंदूच्या नसांना आराम मिळत नाही. अपुऱ्या झोपेमुळे मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा पुरेसा होत नाही. ज्याचा परिणाम तुमच्या मेंदूच्या कार्यावर होण्याची शक्यता असते. जे लोक रात्री झोपताना मोबाईल सोबत ठेवतात त्यांना जास्त प्रमाणात डिप्रेशन आणि ताणतणावाचा धोका असतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद
सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुख:तू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या पाठपुराव्याला यश

## परदेशातील एटीकेटीधारक विद्यार्थ्यांना शासनाने केली शिष्यवृत्ती पुन्हा बहाल...

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राजर्षी शाहू महाराज परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन परदेशात शिकत असणाऱ्या काही विद्यार्थ्यांना एटीकेटी मिळाल्याने त्यांची शिष्यवृत्ती थांबली होती. याबाबत राज्य शासनाकडे या मुलांची शिष्यवृत्ती पुर्ववत करण्यासाठी खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पाठपुरावा केला होता. याला सकारात्मक प्रतिसाद देत शासनाने ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना पुन्हा बहाल केली असून ही अतिशय आनंदाची बाब आहे यामुळे सदर विद्यार्थ्यांचे शिक्षण आता पुन्हा व्यवस्थित होऊ शकेल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी ट्वीट करत व्यक्त केला आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'राजर्षी शाहू महाराज परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती'ही योजना राबविण्यात येते. यामध्ये परदेशातील विद्यार्थ्यांची शिक्षण पूर्ण फी, आरोग्य विमा व व्हिसा शुल्क मिळते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. परंतु अनेकदा नवे वातावरण व अन्य काही कारणांमुळे मुलांना एटीकेटी मिळते. यानंतर त्यांची शिष्यवृत्ती थांबविली जाते.

या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन परदेशात शिकत असणाऱ्या काही विद्यार्थ्यांना एटीकेटी मिळाल्याने त्यांची शिष्यवृत्ती थांबली होती. त्यामुळे त्यांना तेथे मोठा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत राज्य शासनाकडे या मुलांची शिष्यवृत्ती पुर्ववत करण्यासाठी खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पाठपुरावा केला होता. खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खासदार सुप्रियाताई सुळे यांनी आभार मानले आहेत शिवाय सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

# मॉलमध्ये निकृष्ट धान्याची विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** मे. रिलायन्स रिटेल लिमिटेड कंपनीच्या येथील 'रिलायन्स मार्ट' या किराणा व गृहपयोगी वस्तू विक्रीच्या मॉलमध्ये जाळे लागलेले आणि भुंग्यांनी पोखरलेले शेंगदाणे तसेच भुंगे असलेले काबुली चणे ग्राहकांना विकण्यात येत असल्याची गंभीर बाब अन्न व औषध प्रशासन विभागाने अचानकपणे केलेल्या तपासणीतून पुढे आली आहे.

शहरातील महादेव मंदीर मार्गावर असलेल्या रिलायन्स मार्टमध्ये बुधवारी सायंकाळी अचानक भेट देवून तपासणी केली. यावेळी कुजलेले आणि बुरशी व कीड लागलेले जिन्नस येथे विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आढळले. याबाबत येथील अधिकारी, कर्मचारी समाधानकारक खुलासा देऊ शकले नाही. त्यामुळे शेंगदाणे चनासाठा जप्त करण्यात आला.

रिलायन्स मार्ट स्टोअरमध्ये स्थानिक अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी ही धाडसी कारवाई केली. यावेळी विक्रीकरीता ठेवण्यात आलेले गुड लाईफ आणि प्रो नेचर या दोन ब्रँडचे पाकीटबंद शेंगदाणे पूर्णपणे खराब झालेले आढळून आले. दोन्ही ब्रॅन्डचे एक-एक पाकीट उघडून पाहिले असता त्यामध्ये कुजलेले शेंगदाणे आणि कीटकाची जाळी, जळमटे मोठ्या प्रमाणात आढळून आली. तसेच कीटकांनी अर्धवट कुरतडलेल्या दाण्यांची संख्याही मोठी होती. त्यामुळे प्रत्येक ब्रॅन्डचे ४-४ पाकीट नमुन्याकरीता घेण्यात येवून उर्वरीत साठा जप्त करण्यात आला.

पाहिजे
शाळेसाठी अनुभवी
शिक्षिका व लिपीक पाहिजे.
12 वी डि.एड.,बीएड.,एमएस्सी
शांताराई महाविद्यालय ताजनापूर
ता. खुलताबाद
मो.8552971455

आता नाशिक शहरात



राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सोसा लि.,परळी वैजनाथ
नाशिक शाखा : श्रीकृष्ण अव्हेन्यु, बनकर चौक, काठे गल्ली, द्वारका, नाशिक मो.7875113333
अधिक माहितीसाठी Toll Free No : 1800 419 7501 www.rajasthanimultistate.in

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna 8623904312
Abhijeet Shukla 9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO EPS-1995 Option Form Before 01.09.2014 After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
आधार सेवा केंद्र
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
महा ई-सेवा केंद्र
आपले सरकार सेवा केंद्र

CAFE ROCKSTARZ
11:11 ELEVEN ELEVEN
MULTI-CUISINE FAMILY RESTRO AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# तेजोनिधी भगवान परशुराम



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

**आज भगवान परशुराम यांची जयंती आहे. ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा अद्वितीय संगम म्हणजे परशुराम. परशुराम हे जमदग्नी ऋषी आणि माता रेणुका यांचे पुत्र. ते वेदात पारंगत तर होतेच, पण शस्त्र आणि अस्त्रविद्येतही त्यांचा हात धरू शकेल असा त्या काळी संपूर्ण भारतवर्षात कोणी नव्हता. परशुरामांवर दोन आक्षेप घेतले जातात. आधी त्यांच्याकडे वळू या. त्यांच्यावर घेतला जाणारा पहिला आक्षेप हा आहे की त्यांनी वडिलांच्या आज्ञेवरून का होईना पण आपल्या आईचा वध केला. आणि मातृहत्येचे अक्षम्य पाप केले. आणि त्यांच्यावरील दुसरा आरोप हा आहे की त्यांनी एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केली.**

परशुरामांचे वडील म्हणजे जमदग्नी ऋषी हे अत्यंत तपस्वी, शूर आणि बुद्धिमान होते. ते जन्माने ब्राम्हण. तर त्यांची पत्नी रेणुका ही एक राजकन्या आणि क्षत्रिय कुळातली. तिच्या लग्नाच्या वेळी तिच्या वडिलांनी स्वयंवर मांडले होते. त्या वेळी इतर राजांबरोबरच जमदग्नी उपस्थित होते. त्यावेळी जमदग्नी यांचे तेजस्वी रूप पाहून साहजिकच रेणुकेने त्यांच्या गळ्यात माळ घातली. पुढे रेणुका जमदग्नी ऋषींसोबत राहू लागल्यानंतर एक दिवशी ती पाणी आणण्यासाठी नदीवर गेली. त्या ठिकाणी चित्रानंद राजा आपल्या स्त्रियांसह क्रीडा करीत होता. ते पाहून साहजिकच राजवैभवात वाढलेल्या रेणुकेला त्याचे आकर्षण वाटले व तिथे ती क्रीडा बघत थांबली. महर्षी जमदग्नी यांनी हे अंतर्ज्ञानाने जाणले. ते अत्यंत शीघ्रकोपी होते. त्यांनी आपल्या मुलांना तात्काळ रेणुकेचा म्हणजे आपल्या आईचा वध करण्याची आज्ञा दिली. पण मातृहत्येचे पाप लागेल म्हणून त्यांच्या चार मुलांनी ती आज्ञा नाकारली. जमदग्नी ऋषींनी संतापून त्या चारही मुलांना ठार केले. पाचवा मुलगा परशुराम. त्यालाही त्यांनी तीच आज्ञा दिली. जणू त्यांनी एक प्रकारे त्यांची परीक्षाच पाहिली. परशुरामाने वडिलांच्या आज्ञावरून आपल्या आईची हत्या केली. त्यामुळे संतुष्ट झालेल्या जमदग्नींनी परशुरामाला तू चिरंजीव होशील असा वर दिला. तसेच आपली आज्ञा पाळली म्हणून त्यांनी परशुरामाला वर मागण्यास सांगितले. परशुरामांनी त्यांना आपल्या आईला तसेच भावंडांना जिवंत करण्यास सांगितले. तसेच त्यांना आधीच्या गोष्टीची कुठलीही आठवण राहू नये असा वरही मागितला. अशा रीतीने परशुरामांनी



पुन्हा आपल्या आईला आणि भावंडांना जिवंत केले. यात त्यांचे धैर्य, बुद्धिमत्ता आणि प्रसंगावधान दिसून येते. पण या प्रसंगाकडे दुसऱ्या दृष्टीने पण पाहता येते. असे म्हणतात की संतापलेल्या जमदग्निंनी रेणुकेला ' चालती हो ' अशी आज्ञा दिली. ती मग वनामध्ये तपश्चर्या करण्यासाठी निघून गेली. तिची तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर परशुरामांनी तिला पुन्हा घरी आणले. नंतर या तपश्चर्येने शुद्ध झालेल्या रेणुकेसोबत जमदग्नी ऋषींनी उर्वरित आयुष्य घालवले. परशुरामांवर दुसरा आरोप हा आहे की त्यांनी एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली. परंतु या वाक्याचा शब्दशः अर्थ घेणे चुकीचे आहे. त्याचा अर्थ सगळ्या क्षत्रियांशी त्यांचे वैर होते असा नाही. त्या काळात प्रजेवर अन्याय करणारे काही राजे होते. समाजाच्या उच्च अधिकाराच्या पदावर ते बसलेले असताना समाजाचे कल्याण करायच्या ऐवजी ते जुलूम करून समाजाला त्रास देऊ लागले, शोषण करू लागले. तेव्हा त्या अन्यायी राजांना वठणीवर आणण्यासाठी परशुरामांना हाती शस्त्र घ्यावे लागले. त्या जुलुमी शासकांना दूर करून त्यांनी त्या ठिकाणी न्यायाची पुनर्स्थापना केली. या सगळ्यात त्यांचा उद्देश चांगली समाजरचना अस्तित्वात यावी हाच होता. त्यांनी एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली असे जे म्हटले जाते, त्यातही कितपत तथ्य आहे हे सांगता येत नाही. कारण त्यांच्या एकवीस मोहिमांचे तपशील उपलब्ध होत नाहीत. कारण त्यांचा जीवनकाल हा रामायणाच्याही आधीचा होता. सुमारे सात हजार वर्षांपूर्वीचा. फक्त आपण त्यातून अर्थ एवढाच घ्यायचा की ज्या ज्या वेळा त्यांना संपूर्ण भारतवर्षात अन्यायी, प्रजेवर जुलूम करणारे शासक दिसले, त्या त्या वेळी त्यांनी आक्रमण करून त्या दुष्ट शक्तींचा निःपात केला. रामालाही रावणाला आणि दुष्ट वालीला तसेच प्रजेला त्रास देणाऱ्या राक्षसांना मारावेच लागले होते. राम, कृष्ण आणि परशुराम हे विष्णूचे अवतार मानले जातात. त्या तिघांच्याही हातात शस्त्र आहे. त्यांनी आपल्या जीवनातून अन्यायाचा प्रतिकार करण्याचाच संदेश दिला. परशुराम आणि त्यांची आई माता रेणुका यांची भारतात अनेक ठिकाणी मंदिरे आहेत. श्रीरामांचा पराक्रम पाहून त्यांचा आदर करून परशुरामांनी त्यांना आपले वैष्णव धनुष्य प्रदान केले. भगवान कृष्णालाही त्यांनी आपले सुदर्शन चक्र प्रदान केले असे म्हटले जाते. श्रीरामांना धनुष्य दिल्यानंतर त्यांनी युद्ध केले नाही. आपले उर्वरित जीवन समाजाची नवनिर्मिती करण्यासाठी घालवले.

आजच्या काळातही वरच्या पदांवर असणाऱ्या लोकांचे अध :पतन होताना आपल्याला दिसत आहे. स्वार्थ, भ्रष्टाचार दिवसेंदिवस वाढतो आहे. भगवान परशुराम तेजस्वी, पराक्रमी, कर्तबगार तर होतेच पण ते कमालीचे निस्पृह होते. आज समाजात किंवा शासनात वरिष्ठ पदांवर काम करणाऱ्या व्यक्ती या कर्तबगार तर हव्याच पण त्या निर्मोही आणि निस्वार्थी पद्धतीने काम करणाऱ्या हव्या. परशुरामांचे चरित्र हा आदर्श आपल्यापुढे ठेवते.

# क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जगाला सर्वकाळ दिशा देण्याचे महान कार्य भारतीय तत्वज्ञानाने आणि क्रांतिकारी विचारांनी केले आहे. विविध कालखंडातील धार्मिक-वैचारिक क्रांती ही भारत देशच नाही तर जगाच्या स्थित्यंतरातील झालेल्या सर्वांगीण बदलावर आपली छाप सोडली आहे. प्राचीन आणि आधुनिक तत्वज्ञ आणि त्यांच्या कृतीशील तत्वज्ञानाचा मूलगामी प्रभाव भारतीय तत्वज्ञानावर झाला आहे. भारतीय इतिहासाच्या मध्ययुगीन कालखंडात विविध कृतीशील विचारवंत आणि समाजसुधारक होऊन गेले, त्यापैकीच एक म्हणजे बाराव्या शतकातील थोर क्रांतिकारी, समाजसुधारक महात्मा बसवेश्वर होत!**

इसवी सनाचे बारावे शतक म्हणजे संपूर्ण समाजाला वर्णव्यवस्थेने घट्ट विळखा घातलेला भयंकर काळ! पूर्व वैदिक काळातील गुण-कर्माच्या आधारे झालेले माणसांचे वर्गीकरण हे उत्तर वैदिक काळात पूर्णतः कट्टर झाले. 'ज्याच्या हाती शिकार तोच शिकारी' या भिकार न्यायाने शांत, गरीब आणि पापभिरू माणूस शुद्र गणला गेला आणि समाजाची संपूर्ण उतरंड कोसळली गेली. सर्वत्र कर्मकांड आणि वर्ण-वंश भेदाने समाज पुरता पोखरला गेला. चार वर्णांपैकी स्त्री-शुद्रादिकांना माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क नाकारले गेले. त्यांना गावाबाहेर हाकलले गेले. त्यांना जनावरांपेक्षाही हीन दर्जाची वागणूक दिली गेली. माणसासारखाच असलेला दुसरा माणूस अस्पृश्य झाला! अशा कठीण-खडतर काळांत शैव ब्राह्मण कुटुंबात महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला. महात्मा बसवेश्वरांना बालपणात पडलेले प्रश्न सर्वांनाच मोठे अचंबित करून जातात. ते स्वतः शैव ब्राह्मण कुटुंबातील असल्यामुळे त्यांच्या घरी सोवळे-ओवळे आणि इतर कर्मकांडाचे मोठ्या कट्टरतेणे पालन व्हायचे. घरी जर कुणी ब्राम्हणेतर व्यक्ती आला त्याच्यासोबत होणारी देवाण-घेवाण त्यांना अस्वस्थ करायची; आणि मग बसवेश्वर आपली बहिण, वडील आणि आई यांना "आपण यांना का स्पर्श करत नाही? यांना आपण घरात का येऊ देत नाही? यांना आपण दुरून का पाणी देतो?" असे एक ना अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडायचे. याविषयी समाधान झाले नाही की, ते एकटेच विचार करत बसायचे. वयात आल्यावर ब्राम्हण कुलाचाराप्रमाणे तरुणांची मुंज केली जाते. बसवेश्वराची मुंज करण्याचे ठरले तेंव्हा त्यांनी आपल्या नातेवाईक आणि पुरोहितांना 'माझीच मुंज का करायची? ताईची मुंज का करत नाहीत?' असा मुलभूत प्रश्न विचारून सर्वांनाच निरुत्तर केले. "ईश्वर सर्वांवर सारखेच प्रेम करतो. जन्माने, मुंज करून आणि जाणवे परिधान केल्याने कुणी माणूस श्रेष्ठ-ब्राह्मण होत नसून तो कर्मानेच श्रेष्ठ-ब्राह्मण ठरतो" असे बेडर वचन बोलून कणाप्पा यांनी सांगितलेल्या कथेचा दाखला देत मनाला न पटणाऱ्या संस्कारांना नकार देऊन बसवेश्वरांनी घरातून निघून जायचे ठरवले. ही क्रांतिकारी घटना म्हणजे इसविसनपूर्व पाचव्या शतकांतील बोधिसत्व गौतम बुद्ध यांच्या जीवनकार्याशी तंतोतंत मिळती जुळती वाटते. त्यानंतर बसवेश्वरांनी कुडलसंगमाकडे प्रस्थान केले. तिथे जातवेदमुनीच्या सानिध्यात बारा वर्षे अध्ययन केले. सर्वच अध्यात्म-तत्वज्ञान-विचारधारांचा कुडलसंगम याठिकाणी त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यांची वैचारिक-अध्यात्मिक बैठक अत्यंत मजबूत झाली. आपली आगळी-वेगळी भक्ती परंपरा जोपासतांना बसवेश्वर हे भगवान शंकराच्या पिंडीवर फुले वाहून आनंदाने भजन म्हणत खूप नाचायचे!

'भावे गावे गीत शुद्ध करोनिया चित्त' या जगद्गुरू तुकोबांच्या अभंगाप्रमाणे ते भावविभोर होऊन भजन म्हणत नृत्य करायचे! त्यानंतर जातवेद मुनींनी सांगितलेली "मदर चन्नाप्पा" ची कथा खऱ्या अर्थाने बसवेश्वरांना पूर्णतः बदलून गेली! भगवान शंकरांनी पंचपक्वान्नाच्या नैवेद्याऐवजी मादर म्हणजे बहिष्कृत चन्नपाच्या साध्या परंतु अत्यंत प्रेम-श्रद्धा आणि भक्तिभावाने बनवलेल्या आंबील नैवेद्याचा स्वीकार केला! ही कथा एकूण बसवेश्वरांच्या धर्म आणि ईश्वर याविषयीच्या संकल्पना स्पष्ट झाल्या आणि सर्वच माणसे ईश्वराने सारखीच बनवलेली असल्याकारणाने, कुणीही श्रेष्ठ-कनिष्ठ नसून, माणसामाणसामध्ये भेद करणे म्हणजेच ईश्वराचा आणि त्याच्या अद्भुत मनुष्यामात्रांचा अपमान करणे होय याची अनुभूती आली. तिथेच त्यांनी आपले गुरु जातवेद मुनींच्या सल्ल्याने आणि सर्वांगीण विवेकशील विचार करून विवाह केला.

त्यानंतर बसवेश्वरांनी सहा वर्षे मंगळवेढा (पंढरपूर) येथे राहून आपले कार्य करतांना माणसामधला भेद संपुष्टांत आणला. शूद्रातिशूद्र बसवेश्वरांना आपले गुरु मानू लागेल. सर्वच उपेक्षित लोकांना बसवेश्वर आपले वाटायला लागले. "सर्व स्त्री-पुरुष समान असून कुणालाही ईश्वराची पूजा करता येते. इथे कुणी श्रेष्ठ-कनिष्ठ नसून प्रत्येकाला आपली मते मांडण्याचा संपूर्ण अधिकार आहे" असे सांगून त्यांनी 'अनुभवमंटप'ची निर्मिती केली.




त्यानंतर बसवेश्वरांनी शरण चळवळ सुरु केली. आपल्या शरण चळवळ आणि अनुभवमंटपच्या माध्यमातून त्यांनी गावाबाहेरील लोकांना आपल्यासोबत जोडून घेतले. माणसाने माणसाशी प्रेमाने वागावे. अनाचार, चोरी, द्वेष, मत्सर, क्रोध, राग, स्तुती, आत्मस्तुती या विकारांपासून माणसाने दूर रहावे. या पासून दूर राहणे म्हणजेच खऱ्या मानव धर्माचे पालन करणे होय.

हळूहळू सर्वत्र त्यांच्या कार्याची ओळख होऊन लोक त्यांना महात्मा, बसवण्णा संबोधून अल्पावधीतच शरण चळवळ लोकचळवळ झाली. महात्मा बसवेश्वरांचे "मंदिराचा कळस बनून कावळ्याच्या विष्टेने अपवित्र होण्यापेक्षा मला शरणांच्या पायातील पादुका करा, कूडलसंगमदेवा!" हे वचन सुप्रसिद्ध झाले.

आज महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीदिनी त्यांच्या विचारांची देशाला नितांत गरज आहे. सर्वत्र विविध रंगांचे, जात-धर्म-पंथांचे विवेकशून्य भडक स्तोम माजले आहे. माणूस माणसापासून दूर जात आहे. आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे( ? ) हे सांगतांना इतर धर्मांच्या तत्वांची पायमल्ली होता कामा नये. आज महात्मा बसवेश्वरांच्या विचारांवर आपण सर्वांनी चालणे क्रमप्राप्त आहे. माणूस केंद्रस्थानी ठेऊन मानवधर्माचे आचरण करणे अपेक्षित आहे. माणूस अंतर्बाह्य शुद्ध झाला पाहिजे! त्याचे चित्त निर्मळ असून व्यवहार सुद्धा शुद्धच असला पाहिजे!

**देवलोक मृत्युलोक वेगळा नाही।**
**सत्यवचन बोलणे म्हणजे देवलोक।**
**असत्यवचन म्हणजेच मृत्युलोक।**
**सदाचार स्वर्ग, अनाचार नरक आहे।**
आपणच प्रमाण आहोत, कूडलसंगमदेवा!

हे महात्मा बसवेश्वरांचे अत्यंत महत्वपूर्ण वचन असून यानुसार आज प्रत्येक व्यक्तीने आपापल्या धर्म-नीती-तत्वाचे पालन केले पाहिजे. आज महात्मा बसवेश्वर जयंतीबरोबरच मुस्लीम धर्माचा पवित्र सण रमजान ईद, अक्षय तृतीया सारखा मुहूर्त आणि श्री परशुराम जयंती आदिसारख्या चार गोष्टी एकाच दिवशी आल्यामुळे सर्व धर्मीयांनी एकमेकांच्या महान मुल्ये, तत्वांचा सन्मान करून एकमेकांना शुभेच्छा देऊन वर्तमान नित्य आनंदी करणे अपेक्षित आहे. याचबरोबर सर्वच धर्मात द्वेष, मत्सर वृत्तीला आळा बसला पाहिजे. सकल मानवकल्याण साधणारा कोणताही धर्म असो तो धर्मच श्रेष्ठ असून त्याचे पालन करतांना 'कोण्याही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे' या अनुभूतीने सर्व धर्मियांनी वर्तन करावे. सर्वांनी इथे मानवता अखंड रुजवावी! असे झाले तरच खऱ्या अर्थाने महात्मा बसवेश्वर, रमजान ईद, अक्षय तृतीया आणि परशुराम जयंती आदि बाबींचे फलित झाले असे म्हणता येईल! तेंव्हा, इथे केवळ प्रदर्शन न होता माणसांचे अमुलाग्र वर्तन बदलावे हीच माफक अपेक्षा! जय जगतज्योती!

# आखाजीचा आखाजीचा, मोलाचा सन देखाजी...



प्रा.बी.एन. चौधरी
संपर्क क्र. ९४२३४९२५९३

आधुनिक केसरी

**खान्देशात गाव, वाडी, वस्तीवरील निंब, पिंपळ, वडाच्या झाडांवर आकाशासी स्पर्धा करणारे उंच उंच झोपाळे दिसायला लागले म्हणजे समजावं आखाजीचा अर्थात अक्षय तृतीयेचा सण जवळ आला आहे. झोका, आखाजी आणि माहेरवाशीण लेक यांचं एक अतूट नातं खान्देशात आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी तर झोक्याच्या एका टोकाला सासर व दुस-या टोकाला माहेराचं छान नातंच मांडलं आहे. त्या म्हणतात. गेला झोका गेला झोका, चालला माहेराले जी. आला झोका आला झोका,पलट सासराले जी. या झोक्यावर बसून उंच आकाशात झोकाघेत ही माहेरवाशीण स्त्री गाणी गाते. आपल्या मनाला रीतं करते. हा झोका आणि त्यावर बसणा-या तिच्या सख्या तिचं सासरचं दुःख हलकं करतात.**

***माझा झोका माझा झोका,***
***खेयतो वा-यावरी जी.***
***माझा झोका माझा झोका,***
***जीवाची भूक सरेजी.***

पोटाची एक भूक असते तशीच ती मनाची आणि जीवाचीही असते. पोटाची भूक अन्नाने भागते. मात्र, माझ्या जीवाची भूक ह्या झोक्यावर सरते आणि तृप्तीचा आनंद मला मिळतो हा भाव बहिणाबाई या गीतातून व्यक्त करतात. अक्षय तृतीया हा हिंदूंचा महत्वाचा सण आहे. या सणाला सासरी नांदणा-या मुली लेकराबाळासह काही दिवस माहेरी परत येतात. त्या सासरचा ताणतणाव विसरुन हा सण माहेरी साजरा करतात. माहेरी आलेली स्त्री आनंद, उत्साह प्राप्त करुन पुन्हा आशा, उमेद घेवून सासरी परत जाते. तिच्या पोळलेल्या मनाला चंद्राची शितलता देणारा हा सण आहे. सासरचे कष्ट, सासरवास काही क्षणांपुरते कां असेना विसरायला लावणारा हा सण तिच्या जीवाचा जीवलग आहे. खान्देशातील प्रत्येक माऊलीला वाटते की तिची लेक लवकर माहेराला यावी. तिला माहेरी बोलवावे. तिचं सुख दुःख जाणून घ्यावं. शक्य झालं तर ते वाटून घ्यावं. यासाठी ती जात्यावर दळण दळता दळता आपल्या मुलाला पांडूरंगाला सांगते की बहिणाला माहेरी आण. ती त्याची आळवणी करते.

***सरी गयं दयन, दयाम्हा झाऊ दंग.***
***लय आक्काले, आखाजीले पांडूरंग.***

लेक माहेरी येते व माहेरच्या माणसात हरवून जाते. खान्देशात या सणाची वेगळीच नवलाई आहे. अक्षय तृतीया खान्देशात "आखाजी" म्हणून साजरी करतात. या सणापासून खान्देशी लोकांचं नव-वर्ष सुरु होतं. या सणाला खान्देशात लेक म्हणून गौराईची अर्थात पार्वतीची व तिचा पती महादेव म्हणजेच शंकराची पूजा करतात. या सणाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी स्वर्गस्थ पितरांची पूजा केली जाते. यालाच घागर पूजणे असंही म्हणतात. मातीची घागर भरुन तिवर क-हा ( मातीचा छोटा लोटा ) ठेवतात. त्यावर डांगर हे फळ ठेवले जाते. त्यावर पुरणाची पोळी, सांजोरी ठेवतात. नंतर विधीवत पूजन होवून खिर किंवा आंब्याचा रस, खापरावरची पुरण-पोळी, कुरडया, पापड, भज्या यांचा घास वाढून पितरांना व शंकराला नैवद्य दाखविला जातो. घागर भरली की त्यांच्या आत्म्याला शांती मिळते असा समज आहे. दोन दिवसांनी सणाचं उत्सवी वातावरण संपलं की लेक पुन्हा सासरी जायला निघते. तिला घ्यायला आलेल्या तिच्या पती सोबत. शंकरासोबत. अक्षय तृतीयेच्या एक दिवस आगोदर मुली कुंभाराकडून मातीचा बनवलेला शंकर आणतात. तो मातीच्याच नंदीवर बसून येतो. त्याची गौराई सोबत स्थापना करतात. लेकीला सासरी न्यायला तिचा पती आलेला आहे असा हा संस्कार लहान मुलींना खेळातूनच मिळतो.

**साडेतीन मुहर्तांपैकी एक :** ह्या दिवशी हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वैशाख शुद्ध तृतीया येते. अक्षय्य तृतीया हा महत्त्वाच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त समजला जातो. आपल्या पूर्वजांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी या दिवशी पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतात. या दिवशी मातीचे घागरीयेवढे मडके आणून, त्यात पाणी भरून त्यात वाळा टाकतात. त्याने या पाण्याला सुगंध येतो. पळसाच्या पानांच्या केलेल्या पत्रावळीवर व द्रोणात खीर, आंब्याचा रस किंवा चिंचोणी, पापड, कुरडया इत्यादी वाढतात. सुगंधित पाण्याने भरलेला घट ब्राह्मणाला दान केला जातो. असे केल्याने पितरांचा आत्मा शांत होतो असे मानले जाते.

**नुतन कार्यास प्रारंभ :** या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभ कार्याचे फळ 'अक्षय'( न संपणारे ) असे मिळते, असा समज आहे. अक्षय्य तृतीयेला ब्रह्मा व श्रीविष्णु यांच्या मिश्र लहरी उच्च देवतांच्या लोकांतून, म्हणजे सगुणलोकांतून पृथ्वीवर येतात. त्यामुळे पृथ्वीवरील सात्त्विकता १० टक्क्यांनी वाढते, अशी मान्यता आहे. म्हणून अक्षय तृतीयेला घरातील कोणतेही नुतन कार्याचा प्रारंभ करतात. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सदोदित सुख व समृद्धी प्राप्त करून देणाऱ्या देवतेच्या कृतज्ञतेचा भाव ठेवून केलेल्या उपासनेमुळे आपल्यावर होणाऱ्या त्या देवतेच्या कृपादृष्टीचा कधीही क्षय होत नाही, अशी समजूत आहे. **मृत्तिका पूजन :** आपला महाराष्ट्र कृषी प्रधान आहे. सदोदित कृपादृष्टी ठेवणाऱ्या मृत्तिकेमुळेच आपल्याला धान्यलक्ष्मी, धनलक्ष्मी व वैभवलक्ष्मी यांची प्राप्ती होते. अक्षय्य तृतीया हा दिवस म्हणजे कृतज्ञ भाव ठेवून अशा मृत्तिकेची उपासना करण्याचा दिवस. अक्षय तृतीयेच्या काही दिवस आगोदर लहान मुली ओल्या मातीत गव्हाची पेरणी करतात. त्यास नियमित पाणी घालतात. याचे छान हीरवेगार, नाजूक धान उगवतात. या धानाची आखाजीला पूजा केली जाते. हा कषी संस्कृतीचाच सन्मान, गौरव आहे.

**जावयाचा मान :** अक्षय तृतीया अर्थात आखाजी हा सण खान्देशवासीयांसाठी शेतक-यांपासून ते प्रत्येक व्यवसाईकासाठी वेगवेगळे महत्व घेवून येते. या दिवशी नवविवाहीत लेकीला आणि जावायाला सन्मानाने बोलविण्याची प्रथा आहे. सासुरवाडीला गोडधोड पाहुणचार आणि सोबत ऐपतीप्रमाणे आहेर देण्याची परंपरा आहे. या सन्मानासाठी जावाई रुसण्याचीही पध्दत आहे. जावाई नवा असेल, एकूलता एक असेल किंवा भाचाच जावाई बनला असेल तर त्याची ऐट वेगळीच असते. आखाजीचा पित्तर म्हणून जावायालाच मान मिळतो व त्याचे पूजन केले जाते. मुली देखील आपल्या पतीला कसा सन्मान मिळेल यासाठी प्रयत्नरत राहतात. यामुळे तिचं सासरी वजन वाढणार असतं.

**मातीत आळी घालणे व पेरणी :**
पावसाळा तोंडावर घेऊन अक्षय्य तृतीया येते. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीचे मशागत करण्याचे काम अक्षय तृतीयेच्या दिवशी पूर्ण होतात. ( मशागत म्हणजे नांगरलेल्या शेतजमिनीची साफसफाई करून खत मिश्रित मातीच्या थरांना खालीवर करणे. ) या दिवशी मशागत केलेल्या जमिनीतील मृत्तिकेबद्दल कृतज्ञ भाव ठेवून काही शेतकरी पूजन केलेल्या मृतिकेमध्ये आळी घालतात. कोकणात या दिवशी शेतात बियाणे पेरण्याची प्रथा आहे, देशावर नाही. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बियाणे पेरण्यास सुरुवात केल्यास त्या बियाणांपासून विपुल धान्य पिकते व कधीही बियाणाला तोटा पडत नाही. ( बियाणे म्हणजे मळणीतील धान्य आपल्या आवश्यकतेनुसार खाण्यासाठी बाजूला काढून घेऊन पुढच्या पेरणीसाठी राखून ठेवलेले उरलेले धान्य. )



महाराष्ट्राच्या कोकण भागात पावसाचे प्रमाण जास्त असल्या कारणाने एकदा पावसाला सुरुवात झाली की, सतत पाऊस पडत राहिल्याने सुपीक जमिनीतील चिकट मातीमध्ये आळी करून बियाणे पेरणी करणे शक्य होत नाही. त्यामुळे पावसाळा तोंडावर असतांना मशागत केलेल्या भुसभुशीत मातीमध्ये बियाणे पेरणे सोपे जाते. पूर्वीतरी, अक्षय्य तृतीयेच्या शुभमूहुर्तावर म्हणजेच पावसाला सुरुवात होण्यापूर्वी पेरणीची कामे पूर्ण केली जात असत. हल्ली पावसाचे प्रमाण कमी झाल्याने व शास्त्राप्रमाणे पेरणी न केलेल्या जमिनी नापीक होत चालल्या आहेत व कसदार धान्य पिकण्याचे प्रमाणही कमी झाले आहे.

**वृक्षारोपण :** अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आळी लावलेल्या फळबागा भरघोस फळ उत्पादन देतात अशी समजूत आहे. आयुर्वेदात सांगितलेल्या औषधी वनस्पतीही अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर रोवल्यास या वनस्पतींचा क्षय होत नाही, म्हणजेच औषधी वनस्पतींचा तुटवडा भासत नाही. म्हणून हा मुहर्त साधून वृक्षारोपण केले जाते.

**श्रीविष्णू-वैभवलक्ष्मीचे पूजन :**
अक्षय्य तृतीयेच्या दिवशी राज्य चालविणा-यांनी किंवा प्रजेच्या पालनपोषणाची जबाबदारी असणाऱ्यांनी सामूहिकरीत्या कार्यालयात किंवा सामूहिक पूजाविधीच्या ठिकाणी विष्णूसहित वैभवलक्ष्मीच्या प्रतिमेचे कृतज्ञतेचा भाव ठेवून भक्तिभावाने पूजन करावे. यामुळे प्रजा सुखी व समृद्ध होते. नुसत्या लक्ष्मीदेवीची कृपा आपल्यावर होत नाही; कारण लक्ष्मीदेवी ही श्रीविष्णूची शक्ती आहे. जेथे विष्णूलाच बोलावणे नाही, तर त्याच्यासोबत किंवा त्याच्यात असणारी त्याची शक्ती कशी बरे पूजास्थळी येऊन कृपा करेल ? म्हणून कोणत्याही रूपातील लक्ष्मी पूजनाच्या वेळी विष्णूला प्रथम आवाहन करावे व नंतर लक्ष्मीलाही आवाहन करावे. त्यामुळे उपासकाला लक्ष्मीतत्त्वाचा जास्तीत जास्त लाभ होतो असे मान्यता आहे.

**गौरी उत्सवाची सांगता :** वैशाखात चैत्रगौर सासरी जायला निघते. लेकीने अजून काही दिवस माहेरी रहावं अशी गळ तिची आई तिला घालते.

***-हाय -हाय गौराई जाऊ नको, जाऊ नको.***
***जे जे मांगशी दिसू आखो, माय दिसू आखो.***
***तोडा मांगशी दिसू आखो, माय दिसू आखो.***
***कड्ला मांगशी दिसू आखो, माय दिसू आखो.***

अशी अनेक अमिषं आई लेकीला दाखविते तेव्हा लेक म्हणते तु काहीही दिलं तरी मला आता थांबता येणार नाही. कारण माझा पती घरी जायला निघाला आहे व मलाही त्यांच्यासोबत जावे लागेल. त्याची आज्ञा मी मोडू शकत नाही. ती म्हणते........

***शंकर घोड्यावरी, गौराई पायी चाले.***
***कशी राहू माता, शंकर वाट पाहे.***

आणि आपल्या पतीसोबत ती सासरची वाट धरते. माहेर कितीही श्रीमंत असलं तेथे सुबत्ता असली तरी तीचं हक्काचं घर सासरीच आहे हा संदेश यातून मिळतो. गौरीला निरोप देण्याचा कार्यक्रम स्त्रीया आनंद-उत्साहात साजरा करतात. स्त्रिया या दिवशी हळदीकुंकू करून सुवासिनींना कैरीची डाळं, कैरीचे पन्हे, नारळाची करंजी देतात. या दिवशी बत्तासे, मोगरयाची फुले किवा गजरे देतात. भिजवलेल्या हरबरयांनी ओटी भरतात. अशारीतीने गौरी उत्सवाची सांगता करण्यात येते.

**त्रेतायुगाचा प्रारंभदिन :** त्रेतायुगाचा प्रारंभदिन अक्षय्यतृतीया हा होता. या दिवशी एका युगाचा अंत होऊन दुसरया युगाला सुरुवात झाली होती. ज्योतिषशास्त्रात कृत, त्रेता, द्वापर आणि कलियुगाचे सर्व वर्ष मिळून होणारया युगाला 'महायुग' असे म्हणतात. हे चार युग 'युगांधी'( युगचरण ) म्हणून मानले जातात. ब्रह्मदेवाच्या दिवसाचा जो प्रारंभ त्याला 'कल्पादीं' तसेच त्रेतायुगाचा ( १२,९६,००० सौर वर्षाएवढा त्रेतायुगाचाकाळ ) प्रारंभ म्हणजे 'युगांधी' तिथी वैशाख शुद्ध तृतीयेला येत आहे. ज्या दिवशी एका युगाचा अंत होऊन दुसरया युगाला सुरुवात होते, त्या दिवसाला हिदू धर्मशास्त्रात अनन्य साधारण महत्त्व आहे. या दिवसाने एका कलहकालाचा अंत व दुसरया युगाच्या सत्ययुगाची सुरुवात, अशी संधी साधलेली असल्याने तो संपूर्ण दिवस शुभ मानला जातो, म्हणूनच अक्षय्यतृतीया या दिवसाला साडेतीन मुहूर्तांतील एकमुहूर्त मानले जाते.

**पूर्वजांचे ऋण फेडण्याचा दिवस :** अक्षय्यतृतीयेला स्वर्ग लोकांतून सात्त्विकता येत असते. ती सात्त्विकता ग्रहण करण्यासाठी भूवलोकातील अनेक जीव या दिवशी पृथ्वीच्याजवळ येतात. भूवलोकातील बहुतांश जीव हे मानवाचे पूर्वज असतात. पूर्वज पृथ्वी जवळ आल्यामुळे अक्षय्यतृतीयेला मानवाला जास्त त्रास होण्याची शक्यता असते. मानवावर पूर्वजांचे ऋण ही खूप आहे. हे ऋण फेडण्यासाठी मानवाने प्रयत्न करणे ईश्वराला अपेक्षित आहे, यासाठी या दिवशी पूर्वजांना गती मिळविण्यासाठी त्यांना तर्पण करायला पाहिजे, असे ज्योतिषशास्त्रात सांगितले आहे.

आपल्याला पूर्वजांना आवाहन करुन त्यांना तिळ अर्पण करतात व त्यांची प्रार्थना करतात. त्यानंतर पूर्वज सूक्ष्मातून आलेले आहेत व आपण त्यांच्या चरणावर तीळ आणि जल अर्पण करीत आहोत, असा भाव ठेवला जातो. त्यानंतर दोन-तीन मिनिटांनी देवतांच्या तत्त्वांनी भारित झालेले तीळ व अक्षदा पूर्वजांना अर्पण कराव्यात. सात्त्विक बनलेले तीळ हातात घेऊन त्यावरून ताटामध्ये हळुवारपणे पाणी सोडावे. या वेळी देवांना पूर्वजांना गती देण्यासाठी विनंति पूर्वक प्रार्थना करावी, असे शास्त्रात सांगितले आहे. तील तर्पणामुळे पूर्वजांच्या सूक्ष्म देहातील सात्त्विकता वाढून त्यांना पुढच्या लोकात जाण्यासाठी आवश्यक ऊर्जा मिळते व मानवाला पूर्वजांपासून जो काही त्रास होत असल्यास तो कमी होतो, असे धर्मशास्त्रात सांगितले आहे.

**पत्त्याचा फड रंगतो :**
खान्देशात शेतात वर्षभर काम करणा-या गड्याला सालदार म्हणतात. त्याचा वर्षभराचा मेहनताना आखाजीलाच ठरतो. याला साल ठरणं असं म्हणतात. सद्य परीस्थितीत त्याचं साल 70-80 हजार ते एक लाख रुपयांपर्यंत गेलं आहे. खान्देश हा कृषी प्रधान आहे. येथील बहुसंख्य कष्टक-यांना आखाजीला आगाऊ मेहनताना मिळतो. पूर्वीच्याकाळी मनोरंजनाची साधनं नव्हती. अश्यावेळी हातात पैसा आला आणि सण-उत्सवाचं वातावरण असलं तर मनोरंजन म्हणून चौकाचौकात ते पत्याचा डाव मांडत. हीच पध्दत सामान्य माणसातही रुळली आहे. म्हणून आता या सणाला गावागावात पत्त्यांचे फड रंगतात. हजारोंचे डाव लागतात व लाखोंची उलाढाल होते.

असा हा अक्षय आनंद देणारा अक्षय तृतीया अर्थात आखाजीचा सण दर वर्षी मनामनात आनंद आणि उत्साहाची पेरणी करुन जातो. वातावरणात पसरलेला उन्हाळ्याचा चटका सुसह्य करुन जातो. जगण्याची नवी उमेद आणि आलेल्या परीस्थितीला सामोरं जाण्याचं बळ देवून जातो. सण, उत्सव येतात आणि जातात मात्र ते आपलं रोजचं जीवन आनंदी करुन जातात. घरात अडचण, दुःख, संकट असले तरी परंपरा, रुढी, रीती, रिवाजानुसार आपण सण साजरा करतोच. मागचं सारं विसरतो आणि पुढच्या वाटचालीस प्रारंभ करतो. कोणत्याही रुढी-परंपरांचा अतिरेक वाईटच. मात्र, ज्या मनामनाला जोडतात, नात्यांना घट्ट करतात, ह्रदयातलं अंतर मिटवतात असे सण-उत्सव आपण जपले पाहीजेत. पुढच्या पिढीकडे विश्वासार्हतेने सूपूर्द केले पाहिजे. ते आपले संस्कार आहेत. आपली संस्कृती आहेत. हा आपला सांस्कृतीक ठेवा असून निकोप समाज निर्मितीसाठी तो जपणं आवश्यकच आहे.

# स्त्री, पुरुष समानता असलेली तीज, अक्षय तृतीया..!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**खरंच हा एप्रिल महिना किती शुभ आहे नाही का. .? या महिन्यात भगवान महावीर जयंती आली, हनुमान जयंती आली, गुड फ्रायडे आला, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती आली, सोबतच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आली, महिन्याच्या शेवटच्या दिवशी मानवतेचे पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती आली तसेच बरेच शुभ दिवस आलेले आहेत. आज तीज म्हणजेच अक्षय्य तृतीया आली सोबत रमजान ईद मासारंभ, महात्मा बसवेश्वर जयंती आली.**

खरच आपण खूप भाग्यवान आहोत की, एवढ्या भल्या मोठ्या जगात सर्व परिचित असलेल्या पवित्र व पावन असलेल्या भारत भूमीमध्ये आमचा जन्म झाला आहे. याच भूमीमध्ये जन्माला येऊन आपल्या कर्तुत्वाने व जगाच्या कल्याणासाठी शेवटच्या क्षणापर्यंत लढणारे सर्व महाविभूती वंदनीय, पुज्यनिय होऊन गेले आहेत तसेच अजरामर होऊन गेले आहेत व याच महिन्यात एकामागे एक सर्वांच्या जयंत्या सुद्धा आलेल्या आहेत व सर्वधर्म समभाव मानून प्रत्येकांनी जयंती सुद्धा साजरी केली आहे. हे, आम्हां सर्वाचे खूप मोठे भाग्य आहेत चला तर..मग त्या होऊन गेलेल्या सर्व महाविभूतींना वंदन करुया. तसेच आज असलेल्या अक्षय्य तृतीया निमित्ताने सर्वांना मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा देऊया.

खरंच हा एप्रिल महिना अक्षय्यच आहे आनंद देणारा आहे तसेच गावखेड्यात अक्षय्य तृतीयाला तीज नावाने सुध्दा ओळखल्या जाते. व तीज असे म्हणतात. अक्षय्य तृतीया हा सण हिंदू धर्मातील एक विशेष व सर्वपरिचित सण आहे पण, असेही नाही की, हा सण फक्त हिंदू धर्मातील लोक एकटेच साजरे करतात या दिवशी भेदभाव बघायला मिळत नाही. सोयऱ्या,धायऱ्यांना सुध्दा आपल्या घरी जेवायला बोलवतात तसेच गावातील कोणत्याही जातीचा असो किंवा धर्माचा माणूस आदरपूर्वक त्याला मानसन्मान देऊन पाहुणा म्हणून त्याचा आदर करतात व आपल्या सोबत पंक्तीत बसवून जेवू घालतात मी बरेचदा बघितली आहे कारण त्यादिवशी आपला नातेवाईक सोयराच म्हणुन समजतात. या सणानिमित्त घरोघरी पूजा अर्चना केली जाते पण खास करुन या दिवशी मातीच्या लाल माठाची पूजा केली जाते त्या माठाला आमच्या झाडीबोली भाषेत करसा असे म्हणतात व माठावर झाकण असते त्याला सरावू म्हणतात आणि त्याच सरावावर असलेली एक मातीची छोटी भांडी असते तीला करुली असे म्हणतात. या सणाच्या दिवशी पाच आंब्याचा समूह असलेल्या झोकाची पूजा करतात, वडे, पुऱ्या, आंब्याचा पणा,किंवा चिंचेची चिचोनी, पापड, गव्हाच्या शेवया, वरण



भात, भाजी बणवून पडसाच्या पानांची पत्रावळ आणि द्रोण बणवून त्यात सर्व गोड थोड पदार्थ ठेवून नैवेद्य दाखवतात,गाईला नैवद्य चारतात व आपल्या घरी आलेल्या पाच लोकांना जेवू घालतात कोणी दान दक्षिणासुद्धा करतात. यात एक गोष्ट खास करून दिसते कदाचित काही लोकांना माहीत असेल व काहींना माहीत नसेलही ती म्हणजेच ज्या मुलीचे बाबा वारले असतील व तीला भाऊ नसेल तर. .ती, मुलगी आपल्या सासरी सुद्धा तीज करते म्हणजेच बापाच्या नावाचा करसा भरून आणते व रिती रीवाजाप्रमाणे त्याची मनोभावे पूजा, अर्चना करते.व मुलगी होण्याचा पूर्ण धर्म निभावून दाखवते सोबत तिच्या सासरचे लोक सुध्दा तीला साथ देतात दरवर्षी न चुकता तीज सण साजरी करते. आजही समाजात अशाप्रकारची असलेली स्त्री, पुरुष समानता बघून खरंच खुप आनंद वाटतो आजही बऱ्याच ठिकाणी असलेली माणुसकी जिवंत असताना पाहून अभिमान वाटतो. मुलाच्या बाबतीत तर. ..प्रश्नच नाही मग ती झाली की नाही मुलगी वंशाचा दिवा. ..? अशीच समानता प्रत्येक वेळी राहताना दिसली तर...चांगलेच आहे. अक्षय्य तृतीया हा सण आनंद देणारा आहे, आनंद वाटणारा आहे व सुख, समृद्धी, समाधान देणारा आहे.

या सणाच्या दिवशी थोडं वेगळेपणा जाणवतो तो म्हणजेच जो मुलगा असो किंवा मुलगी माठाची पूजा करणारे असतात तोपर्यंत आंबे खात नाही हा जुना रिवाज म्हणावे की, संस्कृती टिकवणे म्हणावे...? कदाचित असे, असेलही काही लोक आजही जुन्या रिती रिवाजाप्रमाणे जगत आहेत व जगताना दिसत आहेत. व अशा काही लहान मोठ्या गोष्टी आजच्या व येणाऱ्या भावी पिढीला माहीत होतील...व माहिती असणे आवश्यक आहे. अक्षय्य तृतीया या सणानिमित्त पुनश्च एकदा सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

# पृथ्वीला महाविनाशातून कोण वाचविणार ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मानवाला सुखाने जगायचे व आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला व पृथ्वीला तिच्या महाविनाशापासून वाचविता आले पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.**

वसुंधरा किंवा पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरण संवर्धन जागृती करण्यासाठी जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी- संपातबिंदू होतो, तोच पृथ्वी दिन पाळतात.

महाभारतामध्ये भारताच्या वर्णनाप्रमाणेच जगातील अन्य भौगोलिक स्थळांचे वर्णन आढळते. उदा. मंगोलियाचे गोबी वाळवंट, इजिप्तची नाईल नदी, लाल समुद्र इत्यादी इत्यादी. तसेच महाभारतातल्या भीष्म पर्वातील जम्बुखंड- विनिर्माण पर्वात संपूर्ण पृथ्वीचे मानचित्र सांगितले आहे. ते असे-

***"सुदर्शनं प्रवक्ष्यामि द्वीपं तु कुरुनन्दन|***
***परिमण्डलो महाराज द्वीपोसौ चक्रसंस्थितः||***
***यथाहि पुरुषः पश्येदादर्शे मुखमात्मनः|***
***एवं सुदर्शनद्वीपो दृश्यते चन्द्रमण्डले||***
***द्विरंशे पिप्पलस्तत्र द्विरंशेच शशो महान्||***
***याचा अर्थ- हे कुरुनन्दन!***

सुदर्शन नावाचे हे द्वीप चक्राप्रमाणे गोलाकार स्थित आहे. ज्याप्रमाणे पुरुष आरशात आपला चेहरा बघतो, त्याचप्रमाणे हे द्वीप चंद्रावरती दिसते. याच्यातील दोन अंशांमध्ये पिंपळाची पाने आणि दोन अंशांमध्ये मोठा ससा दिसतो.

पृथ्वी दिनासाठी जॉन मक्डॉनेल याने बनवलेला अनधिकृत ध्वज पर्यावरण रक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने फडकविला जातो. अमेरिकेचा सिनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला. तरीही त्या कार्यक्रमाचे राष्ट्रीय समन्वयक असलेले डेनिस हेस यांनी स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन केले व पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सद्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली. पृथ्वी हा सूर्यमालेतील सूर्यापासूनच्या अंतरानुक्रमे तिसरा तर आकारानुक्रमे पाचवा ग्रह आहे. सूर्यमालेतील खडकाळ ग्रहांमध्ये हा सर्वांत मोठा आहे. पृथ्वीला निळाग्रह असेही म्हणतात. जिथे जीवन आहे, अशी पूर्ण विश्वात ही एकमेव ज्ञात जागा आहे. पृथ्वीची निर्मिती साधारणपणे ४५७ कोटी वर्षांपूर्वी झालीअसावी. तिचा उपग्रह चंद्र साधारणपणे ४५३ कोटी वर्षांपूर्वीपासून तिला प्रदक्षिणा घालू लागला. हिचा व्यास १२,७५६ किमी एवढा आहे. सूर्यापासून तिचे अंतर साधारणपणे १४,९५,९७,८९० किमी एवढे आहे. पृथ्वीला स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास २४ तास लागतात. तसेच सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास ३६५ दिवस लागतात. या ३६५ दिवसांच्या कालावधीला आपण एक वर्ष म्हणतो. पृथ्वी तिच्या स्वतःभोवती फिरण्याच्या आसापासून २३.५ अंशांनी कललेली आहे. याच स्थितीत ती स्वतःभोवती व सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करते, म्हणूनच पृथ्वीवर उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे ऋतुचक्र सुरू असते. मानवाला सुखाने जगायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण,



वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पोहचण्यासाठी साधारणतः ८ मिनिटे २० सेकंद लागतात. पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार मार्गाने प्रदक्षिणा पूर्ण करते. या प्रदक्षिणेमध्ये थोडाजरी फरक पडला असता, तर पृथ्वीवर कदाचित जीवसृष्टी निर्माण झाली नसती. पृथ्वीची रचना, गुरुत्वाकर्षण, सूर्यापासूनचे ठराविक अंतर आणि पृथ्वीवर असलेले वातावरण यामुळेच तिच्यावर जीवसृष्टी निर्माण झाली असावी, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. पृथ्वीशिवाय इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी नाही. पृथ्वी स्वतः चुंबक असल्याने पृथ्वीभोवती चुंबकिय क्षेत्र आहे, या चुंबकीय क्षेत्रमुळे सूर्यापासून येणारे हानीकारक किरण पृथ्वीच्या धृवीय क्षेत्राकडे वळतात.

पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर भौगोलिक आणि जैविक प्रक्रियांनी तिच्यात खूप परिवर्तन झाले आहे. पृथ्वी आपल्या अक्षाभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. ती तळाच्या उंचीचा हिस्टोग्राम तिच्या तळावर पाण्याची विपुलता एक अद्‌भूत वैशिष्ट्य आहे, जे सौर मंडळाच्या अन्य ग्रहांपासून या निळ्या ग्रहाला वेगळे करते. पृथ्वीच्या जलमंडळात मुख्यतः महासागर आहे, परंतु तांत्रिक रूपाने दुनियेत उपस्थित इतर पाण्याचे स्रोत जसे- अंतर्देशीय समुद्र, तलाव, नदी आणि दोन हजार मीटर खोल भूमिगत पाण्यासहित यात सामावले आहे. पाण्यातील सर्वात खोल जागा १०,९११.४ मीटर खोल प्रशांत महासागरमध्ये मारियाना ट्रेंचची चैलेंजर डीप आहे. कॅनडा मधील रॉकी पर्वत मोराइन लेकला दुर्लक्षित करतो. जीवन टिकवून ठेवणारा एक ग्रह म्हणजे जगणे अस्तित्वात नसले, तरीसुद्धा राहण्यायोग्य असे म्हटले जाते. पृथ्वी द्रव पाणी पुरवते- एक वातावरण जेथे जटिल सेंद्रिय अणू एकत्र येऊन संवाद साधू शकतात आणि चयापचय प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी ऊर्जा देऊ शकतात. माणूस चंद्रावर जाऊन तेथे वास्तव्य करण्याची भाषा- वल्गना करत आहे, मात्र त्याला या साध्या पृथ्वीवर धड चालता येत नाही. त्याच्या अशा बेजबाबदार चालण्या-वागण्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले, तर पृथ्वीचा महाविनाश अटळ आहे. म्हणून मानवजातीचा तळपट थांबविण्यासाठी मानवाने सावध वागलेच पाहिजे, हीच त्याची पूज्य बुद्धी ठरेल!

!! वसुंधरा दिनाच्या समस्त बुद्धिजीवी प्राण्यांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्वर

आधुनिक केसरी



सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री- पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला.

माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, जात-पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

# ज्ञानाची भूक भागविणारी ज्ञानपोई



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**लहान-लहान मुलांच्या मेंदूत त्यांना माहीत असलेल्या त्यांच्या कल्पना विश्वातल्या अव्यक्त बाबी तयार होत असतात. त्यामध्ये विविध घटकांचा समावेश असतो, नाती-संबंध, कुटुंब परिसर, शाळा, मित्र-मैत्रिनी इत्यादी. या विषयी कुतूहल जागविण्याचे काम करताना बालगीते, कविता करीत असतात, याचा प्रत्यय अय्युब पठाण लोहगावकर यांचा 'ज्ञानपोई' या बालगीतांचा संग्रह वाचताना येते. चित्रकार व लेखक सरदार जाधव यांनी रेखाटलेले "ज्ञानपोई" चे सुंदर मुखपृष्ठ निश्चितच कौतुकाला पात्र ठरणारे आहे. आपल्या रोजच्या व्यस्त कामातून मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणारी आईचे हे चित्र पाहून वाटते की....**

**लक्ष देण्यासर्वांवर,**
**आडी जिला ईश्वर**
**जिचे अनंत उपकार**
**ती 'माय' असते."**

आईची थोरवी कथन करणाऱ्या अनेक कविता यामध्ये वाचावयास मिळतील. "माझी ज्ञानपोई" ही त्यापैकी एक होय. आईची उणीव भासते तेव्हाच्या भावना व्यक्त करताना कवी अय्युख पठाण म्हणतात,

**"देवा घरी तुझी गेली म्हणे आई**
**हाक त्याने देता तूच केली घाई"**
किंवा
**"शाळेमध्ये मिळे पुस्तकाचे ज्ञान,**
**तुझ्याने लागली मज ज्ञानाची तहान !"**
तर
**"शाळेसारखीच तूच होती आई.**
**आई अन् शाळा माझी ज्ञानपोई"**
**'आनंदाचे गाव, मी ज्ञानपोई,**
**गुरु, भाकरीचा बंगला, मी ज्ञानपोई होईन'**

या सारख्या कविता योग्य चालीमध्ये मुले सादर करतील. त्या निश्चित सर्वांना आवडतील, आणि पाठही होतील यात शंका नाही, मुलांच्या भावविश्वातील कल्पनेत रमणाऱ्या अशा काही कविताही यात आहेत. उदा. चांदोबाचे घर, भाज्यांचे भांडण, प्राण्यांचे किल्ले, पाखरांची शाळा, इत्यादि कवितांचा आवर्जुन उल्लेख करावासा वाटतो. झाडे, वेली- पाने, फुले, फळे,पशु- पक्षी

या घटकांचाही विचार कवीने केला आहे. कारण

**"फुले आणि फुलपाखरे**
**हीच कवीची धुळाक्षरे**
**डोंगरांच्या रांगा खड्या**
**ह्या कवीच्या बाराखड्या,**

असे कवी आणि कविताबद्दल आचार्य अत्रे म्हणायचे. या म्हणीमुळे वाढलेला भाषेचा वाढलेला गोडवा पुस्तकातील अक्षरे बाहेर पडल्यामुळे झालेला गोंधळ सांगता-सांगता, पुस्तकांशी दोस्ती करावी. असा संदेश देणारी कविता निश्चीतच

प्रेरणादायक आहे. श्री अय्युब पठाण हे उपक्रमशील आदर्श शिक्षक असल्यामुळे मुलांना आवडणाऱ्या अनेक गोष्टी रंजकपणे या कविता मधून त्यांनी मांडल्या आहेत.

**डॉरेमॉन, मोबाईल, किंवा नको मोबाईल,** याही कविता ज्ञानपोई या बाल कवितासंग्रहात आहे. ज्ञान आणि मनोरंजनाची सांगड घालणारा ज्ञानपोई' हा काव्यसंग्रह विद्यार्थी शिक्षक-पालक हे या काव्यसंग्रहाचे निश्चितच स्वागत करतील. समर्पक चित्रे, उत्कृष्ट छपाई, आकर्षक मुखपृष्ठ यांनी सजलेली ही "ज्ञानपोई" प्रत्येक मुलाच्या हाती असावी असे मला वाटते.

श्री अय्युब पठाण लोहगांवकर यांच्या पुढील वाटचालीस आणि कसदार लेखनास हार्दिक शुभेच्छा. परीक्षण लेखन

**बाळकृष्ण मुरलीधर बाचल,**
**पुणे.**
**कवितासंग्रहः- ज्ञानपोई**
**कवी: अय्युब पठाण लोहगांवकर**
**तेजस प्रकाशन, औरंगाबाद.**
**एकूण पृष्ठे: ५८.**
**मूल्य: १०० रुपये**



# तुकाराम आश्रय वृद्धाश्रमास अन्नधान्य भेट !

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** ऋणानुबंध समाज विकास संस्था द्वारा संचलित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे 'ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच दैनिक भारत संग्राम व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी जपत डॉ बाबासाहेब आबेडकर जयंतीनिमित्त भोकर येथील वृद्धाश्रमास अन्नधान्य व किराणा भेट म्हणून दिले,भोकर येथे वृद्धाश्रमामध्ये ९ वृद्ध दाखल असून त्यांचा रोज जेवणाचा खर्च औषध उपचाराचा खर्च संचालक प्रशांत डोंगरदिवे हे करत आहेत 'आणि करत असलेल्या चांगल्या कामाला हातभार व खारीचा वाटा असावा म्हणून 'दैनिक भारत संग्राम चे चिखली ग्रामीण प्रतिनिधी कैलास देशमुख यांनी गहू त्याचप्रमाणे ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब वायाळ व चिखली तालुका अध्यक्ष ज्ञानदेव वायाळ यांनी तांदूळ 'त्याचप्रमाणे माजी पोलीस अधिकारी 'अशोक काकडे व पत्रकार सचिन खंडारे व ग्राहक संरक्षण समितीचे विदर्भ मुख्य संघटक सुनील अंभोरे यांनी साखर, रवा खाद्यतेल आदि अत्यावश्यक सामान वृद्धाश्रमास भेट म्हणून दिले 'यावेळी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमांमध्ये आश्रमाच्या वतीने सत्कार करण्यात आला 'यावेळी चिखली तालुका अध्यक्ष ग्राहक समितीचे ज्ञानदेव वायाळ यांनी 'वृद्धांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा असून सेवा करणाऱ्याला नक्कीच ईश्वर पुण्य देतो असे आपले मत त्यांनी व्यक्त केले,त्याचप्रमाणे ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब वायाळ ' यांनी सुद्धा आपले मत व्यक्त केले 'तसेच ग्राहक उपभोक्ता समितीचे विदर्भ मुख्य संघटक 'सुनील अंभोरे यांनी आपल्या भाषणामध्ये ' वृद्धप काळामध्ये मुलांनी आपल्या आई-वडिलांची सेवा करावी जर मुलांनी आपल्या आई-वडिलांची सेवा केली तर वृद्धाश्रम काढायचं काम पडणार नाही 'नंतर अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख तथा ग्राहक उपभोक्ता समितीचे विदर्भ व उपाध्यक्ष सचिन खंडारे यांनी आपल्या अध्यक्ष भाषणातून 'सांगितले




की 'खऱ्या अर्थाने प्रशांत डोंगरदिवे हे वृद्धपकाळामध्ये वृद्धांची सावली व माऊली झाली आहे 'तेच तुमचे पुत्र असून ते करत असलेली सेवा खऱ्या अर्थाने सार्थकी लागत आहे 'असे सुद्धा यावेळी पत्रकार सचिन खंडारे यांनी सांगितले यावेळी सूत्रसंचालन प्रशांत डोंगरदिवे यांनी तर आभार प्रदर्शन रुपाली डोंगरदिवे यांनी केले 'यावेळी वृद्धाश्रमातील वृद्धासह संस्थेचे अध्यक्ष लता डोंगरदिवे, सचिव अविनाश डोंगरदिवे, अंतःकला साळवे, अर्चना डोंगरदिवे, तुळशीराम डोंगरदिवे,नामदेव डोंगरदिवे, प्रियांका वानखेडे, सरोदे, भैया डोंगरदिवे, तुषार डोंगरदिवे यांच्या सह इतर उपस्थित होते.



# चिमुकल्यांना दोनशे झाडे देऊन जगवण्याचा वाढदिवसानिमित्त संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला पुन्हा ऑक्सिजनची कमतरता भासू नये या उद्देशाने संस्कृती सयाजी गव्हाणे या पहिलीच्या वर्गात शिकणाऱ्या चिमुकलीने आपल्या वाढदिवसानिमित्त 200 छोट्या मैत्रिणींना छोटसं झाडाचं रोपट देऊन जगवण्याचा आणि त्यातून भविष्यात सर्वांना ऑक्सिजन मिळवता येईल या उद्देशाने वृक्षारोपण करून हा संकल्प केला आहे. शासन झाडे लावा, झाडे जगवा फक्त जाहिरातीद्वारे प्रचार, प्रसार करीत आहे मात्र प्रत्यक्षात झाडे लावण्यापेक्षा वृक्षतोडीवर चोरट्या मार्गाने मोठी भर घातली जात असून सुद्धा वनाधिकारी उघड्या डोळ्याने फक्त वृक्षतोड करताना पाहत आहेत. परंतु शेवगाव तालुक्याच्या मौजे मुरमी येथील इयत्ता पहिलीच्या वर्गात शिकणारी सात वर्षे वयाची संस्कृती सयाजी गव्हाणे या चिमुकलीने वाढदिवसानिमित्त किमान 200 हून अधिक आपल्या लहानग्या मैत्रिणींना छोटसं झाडाचे रोपटे देऊन त्याचे संगोपन करून वटवृक्षात रूपांतर करून मागील महाभयंकर अशा कोरोना महामारीत ऑक्सिजनची कमतरता भासल्यामुळे अनेकांना पर्यायाने आपला जीव गमवा लागला याची पुन्हा पुर्नरावृत्ती होऊ नये आणि ऑक्सिजनची कमतरता भासू नये या उद्देशाने या चिमुकलीने वृक्षरोपणाचा संकल्प हाती घेऊन आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी वडील सयाजी गव्हाणे व आई राधा गव्हाणे यांना ही गोष्ट सांगून तिने आपला वाढदिवस अशा आगळे वेगळ्या पद्धतीने साजरा करून स्नेहभजनाबरोबरच मनोरंजनात्मक अशा कार्यक्रमाची मेजवानीही दिली. कार्यक्रमासाठी रामभाऊ गव्हाणे लिंबाजी गव्हाणे लवंगाबाई गव्हाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नितीनराव काकडे, शेषराव मामा वंजारी, ग्रामपंचायत सदस्य महादेव गायकवाड, भारत बांमदळे, ज्ञानेश्वर वैद्य, ज्योतीराम शेळके, आदिनाथ मासाळकर, सुभाष चेडे, अशोक काजळे, अशोक गरड, भोलेनाथ गरड, हरिभाऊ केसभट, मानसिंग देशमुख, योगेश पोकळे, सचिन वैद्य सर, इब्राहिम शेख सर, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्र्याच्या मतदारसंघात भाजपाने घेतले सर्वच उमेदवारी अर्ज मागे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** निवडणूकीत भाजपा,सेना (शिंदे गट ) युतीचा फार्मुला पालकमंत्र्यानी मान्य केला नसल्याने भाजपाच्या सर्वच उमेदवाराची बाजर समिती निवडणूकीत माघार घेतल्याने फक्त केंद्रात, राज्यातच भाजप शिवसेना-शिंदे गटाची युती आहे का वरिष्ठांनी येथे युती करा असे आदेश दिले होते. परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती पैठण निवडणुकीसाठी भाजप शिवसेना युतीत भाजपला समाधानकारक जागा न दिल्याने व युती न झाल्याने भारतीय जनता पक्षाच्या सर्व उमेदवारानी अर्ज परत घेतले आहे. पैठण बाजार समितीच्या निवडणूकीत भाजपा शिवसेना ( शिंदे गटाची) युती फिसकटली असुन येत्या ३० एप्रिल रोजी होत असलेल्या एकुण १८ जागापैकी भाजपाला शिंदे गटाकडून एकही जागा न दिल्याने भाजपा शिवसेना ( शिंदे गटाचे) पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या मतदार संघांत बाजार समितीच्या निवडणुकीतुन भाजपाची माघार भाजपाने एकुण १३ उमेदवारी अर्ज तालुकाअध्यक्ष सुनिल शिंदे यांच्या व पदाधिकारीच्या उपस्थिती गुरुवारी माघारी घेतल्याने आता पैठण बाजार समिती निवडणूकीत फक्त शिवसेना ( शिंदे गटाचे) उमेदवार उभे असुन महाविकास अघाडीच्यात समोरासमोर लढत पाहायला मिळणार आहे. यावेळी पैठण भाजप तालुकाध्यक्ष डॉ. सुनील शिंदे, सूरज लोळगे, जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण औटे, राजू भांड, संतोष खराद, दत्ता वाकडे, प्रशांत अव्हाड, सर्वच उमेदवार व पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

> राज्यात भाजप शिवसेना( शिंदे गट ) युती आहे परंतु पैठण बाजार समितीच्या होत असलेल्या निवडणूकीत १८ जागेसाठी मतदान आहे परंतु साठ चाळीसचा फार्मुला पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी मान्य न केल्यामुळे भाजपाच्या वतीने बाजार समिती निवडणूकीसाठी भरलेले १३ उमेदवाराचे अर्ज आम्ही मागे घेतले असुन पक्ष वाढीसाठी आम्ही नेहमी काम करु तसेच पक्षाच्या आदेशानुसार या बाजार समितीच्या निवडणुकीत काम करू.
>
> **डॉ.सुनिल शिंदे, तालुकाध्यक्ष भाजपा,पैठण**

# अलंकार सिनेमागृहाला आग, लाखोंचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ब्रम्हपुरी शहरातील अलंकार सिनेमागृह जळून बेचिराख झाले आहे. आगीत सिनेमागृह मधील सर्व साहित्य जळाल्याने लाखोंचे आर्थिक नुकसान झाले आहे. ब्रम्हपुरी तालुक्यातील एकमेव सिनेमागृह आरमोरी मार्गावर आहे. गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास सिनेमा गृहाला आग लागून संपूर्ण सिनेमागृहातील साहित्य जळून खाक झाले. समोरील लोखंडी दार कुलूप लावून बंद करण्यात आले होते. आत जाण्यासाठी दुसरा मार्ग नाही. सकाळी दहा वाजताच्या सुमारास येथील कर्मचाऱ्यांनी दार उघडून आत प्रवेश केला असता सदर प्रकार निदर्शनात आला. मशीन, पडदा, पडद्यामागील साऊंड, इलेक्ट्रिक साहित्य पूर्णतः जळून खाक झाल्याने मालकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. दरम्यान ही आग नेमकी कशी लागली हे अजून कळले नाही.



# कन्नड बहुउद्देशीय खादी ग्रामोद्योग संस्थेवर परिवर्तन पॅनलचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुका औद्योगिक बहुउद्देशीय ग्रामीण सहकारी संस्था संचालक मंडळाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पॅनल प्रमुख राजेंद्र नामदेवराव गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली परिवर्तन विकास पॅनल चे 11 पैकी 9 जागा जिंकून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. यामध्ये विजयी उमेदवार अल्हाड नवनाथ, गव्हाणे राजेंद्र, नागरे कारभारी, शेख तूफेल शेख ,ज्ञाने शिवप्रभू , सुदाम पवार, संगीता गव्हाणे, ज्योती बोरसे हे उमेदवार विजयी झाले असुन या निवडीबद्दल केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड , केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर माजी उपमहापौर भगवान बापू घडामोडे भाजपा जिल्हाध्यक्ष विजय औताडे जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, जि प सदस्य किशोर पवार यांनी सर्व नवनिर्वाचित सभासद तसेच मतदारांचे आभार व्यक्त करून अभिनंदन केले.



# 18 जागांसाठी 40 उमेदवार रिंगणात

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री बाजार समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे, यातच काल दिनांक 20 एप्रिल रोजी अखेर च्या दिवशी 148 अर्जा पैकी 96 उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.

आता 18 जागांसाठी 40 उमेदवार रिंगणात उरले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विष्णू रोडगे यांनी दिली. तालुक्यातील सोसायटी मतदार संघ, व्यापारी मतदार संघ , ग्रामपंचायत मतदार संघ व हमाल मापारी या मतदारसंघातून निवडणूक होत आहे. यासाठी सर्व पक्षीय नेत्यांची फिल्डींग लावली आहे. निवडणूकीसाठी महाविकास आघाडी फिक्स तर भाजपा शिंदे गटात दुफळी असे चित्र निर्माण झाले आहे. याचा फायदा कोणाला होतो निवडणूक निकालावर अवलंबून आहे. सोसायटी मतदार संघ सर्व साधारण मतदार संघ सात जागांसाठी सर्व साधारण महिला मतदार संघात दोन जागांसाठी पाच अर्ज इतर मागासवर्गीय मतदार संघात एका जागेसाठी दोन अर्ज विमुक्त जाती भटक्या जमाती मतदार संघात एका जागेसाठी दोन अर्ज ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदारसंघात दोन जागांसाठी चार अर्ज आर्थिक दुर्बल घटक एका जागेसाठी दोन अर्ज अनुसूचित जाती जमाती जागेसाठी दोन अर्ज व्यापारी मतदारसंघात दोन जागांसाठी दोन अर्ज हमाल मापारी मतदारसंघात एका जागेसाठी 4 अर्ज असे एकूण 18 जागांसाठी 40 उमेदवार निवडणूक रिंगणात उतरून आपले नशीब आजमावत आहेत.

# फर्दापूर पोलिस स्टेशनकडून इफ्तार पार्टीचे आयोजन

## डॉ. विजयकुमार मराठे उपविभागीय अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे दि.२०/४/२३ गुरुवार रोजी सपोनि भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. पवित्र रमजान महिन्यात अनुषंगाने फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांच्याकडून इफ्तार पार्टी आयोजन गुरुवार रोजी सध्यांकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आली होते या इफ्तारपार्टीत फर्दापूर व सावळदबारा सर्वधर्मीय नागरिक, पत्रकार बंन्धू उपस्थित होते. उपस्थिताना संबोधन करताना सपोनि भरत मोरे यांनी आगमी रमजान ईदच्या शुभेच्छा देत सदभावनेन व शांततेचे आवाहन करून ईद उत्साहात व शांततेत सर्वांनी एकत्र साजरी करावी, असे आवाहन केले. सपोनी भरत मोरे यांनी सर्व धर्मसमभाव च्य भावनेने ईद सण साजरा करावी, असे आवाहन केले फर्दापूर ठाण्याच्या खुल्या वातावरणात सर्वांनी इंफ्तार करत नमाज पठण केले याप्रसंगी फर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोयगाव, जामठी, डाभा, नांदगाव, मोलखेडा,घाणेगांव तांडा, फर्दापूर व सावळदबारा येथील प्रा.जिवन कोलते पाटील, उपसरपंच मो.आरिफ मो. लुखमान, पो.पा.विलास कुल्ले, डॉ. जफर सय्यद, मोहन सुरडकर, उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, पत्रकार रहीमखॉन, जब्बार डी तडवी, गणेश खैरे, अरुण नप्ते, पत्रकार, विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती.



# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आयोजित राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव 'स्पंदन-२०२३' CSMSS येथे शनिवारी व रविवारी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** स्पंदन म्हणजे व्हायब्रेशन, स्पंदन म्हणजे परफेक्शन, स्पंदन म्हणजे लय, ताल व गती यांचा त्रिवेणी संगम, अभ्यास प्रात्यक्षिके व ओपिडिज यांच्या जाळ्यात अडकलेल्या भावी डॉक्टरामध्ये पडलेल्या कला गुणांचा आविष्कार म्हणजे स्पंदन. त्यामुळे आपल्या सर्व भावी डॉक्टरांना स्पंदनमध्ये सहभागी झाल्यानंतर मिळालेली ऊर्जा, भविष्यकाळामध्ये त्यांच्याकडे वेदना घेऊन येणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावरील हसू फुलवण्यासाठी मदत करेल. त्यामुळेच हा अनुभव वर्षानुवर्षे असाच सुप्त राहील. यासाठी आपले सहकार्य मिळत राहील. याची खात्री आम्हाला वाटते. महाराष्ट्रामध्ये 'स्पंदन - २०२३' नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नवी मुंबई, व कोल्हापूर या भागामध्ये विविध कला प्रकारामध्ये सादर होणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथे दि. २२ व २३ एप्रिल रोजी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था आयुर्वेद महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव 'स्पंदन-२०२३' (नाट्यकला) चे आयोजन करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर विभागासाठी नाट्यकला प्रकारात एकांकिका, विडंबन नाट्य, मुकअभिनय (समूह) आणि मिमिक्री हे कलाप्रकार होणार आहेत. यामधे महाराष्ट्रातील ३२ महाविद्यालयाच्या जवळपास ३७५ विद्यार्थ्यांनी नाट्यकला प्रकारात विविध सादरीकरनासाठी सहभाग नोंदविला आहे. यामधे मुले १६८ व मुली २०७ तर संघ व्यवस्थापक म्हणून पुरुष १० आणि स्त्री १८ येणार आहेत.

'स्पंदन २०२३' चे उद्घाटन शनिवार, दि.२२ रोजी ज्येष्ठ रंगकर्मी आणि सुप्रसिद्ध कवी प्रा. डॉ. श्री. दासू वैद्य यांच्या शुभहस्ते सकाळी १० वाजता होणार असून कार्यक्रमाचे प्रमूख पाहुणे छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रणजीत मुळे राहणार आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अधिपत्याखाली होत असून मा. कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांच्या संकल्पनेतून 'स्पंदन २०२३' होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाचे डॉ. मिलिंद निकुंभ (प्रति कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), डॉ. सुनील फुगारे ( उप-कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा समन्वयक, स्पंदन २०२३), डॉ. मनोज कुमार मोरे (संचालक, विदयार्थी कल्याण विभाग, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) व डॉ. राहुल शिंदे (समन्वयक, स्पंदन २०२३ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. 'स्पंदन २०२३' या राज्यस्तरिय महोत्सवामधे जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपल्या सुप्त गुणांचे यशस्वीरित्या सहभाग नोंदवावा, असे आवाहन छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, श्री. रणजीत मुळे, संस्थेचे सचिव श्री. पद्माकर मुळे व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी तथा आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, आयुर्वेद महाविद्यालय शैक्षणिकप्रमुख डॉ. जयश्री देशमुख, मानव संसाधन अधिकारी श्री. अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी श्री. संजय अंबादास पाटील आणि विभागप्रमुख आदी उपस्थित होते.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# अवैध धंद्याची बातमी छापणाऱ्या पत्रकारांच्या घरी रात्री पोलीस व तस्कराची धमकोगिरी

## वडोद बाजार पोलीस ठाण्याच्या 'त्या' पोलीसांविरुद्ध कार्यवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** छत्रपती सभाजी नगर जिल्ह्यातील वडोद बाजार ता फुलंब्री येथील पोलीस ठाणे हद्दीत बोकाळलेल्या अवैध धंद्या बाबत बातमी छापली म्हणून पत्रकाराला घरी जाऊन धमकावणाऱ्या व आत्महत्या करणाऱ्या परावृत करणार्या पोलीस ठाणे वडोद बाजार च्या त्या पोलिसांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र पत्रकार जनसेवा संघातर्फे करण्यात आली आहे .

फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीत अनेक ठिकाणी अवैध देशी दारू विक्री , अवैध पत्त्याचे कल्ब , ऑनलाईन सट्टा - मटका यासह अवैध वाळू वाहतूक , अवैध वृक्षतोड , अवैध गोमास वाहतुक , जोरात सुरु असून वडोद पोलीस ठाण्यात नव्याने आलेले स पो नि विलास मोरे हे धंदे रोखण्यात अपयशी ठरले असून आर्थिक संबंधातून वडोद बाजार पोलिसांकडून अवैध धंदे चालकांना अभय दिले असून याबाबत समस्त नागरिक त्रस्त असल्याने अनेकांनी वारंवार तक्रारी करूनही फायदा होत नसल्याने परिसरातील दैनिकाच्या प्रतिनिधींनी या अवैध धंदा बाबत व पोलिसांच्या आर्थिक हितसंबंधा बाबत दि १६ - १८ - १९ रोजी दैनिकात बातम्या प्रकाशित केल्याने वडोद बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल व अवैध धंदे चालकांचे वसुली संबंध असल्याने जनतेच्या हिताच्या बातम्या आल्यानंतर त्यांच पीक खवळले.

अवैध वाळु वाहतूकदार आणि पोलीस यांनी त्यांच्या घरी रात्री जाऊन त्यांच्या पत्नीस आरवाच्च भाषेत शिवीगाळ करत तुझ्या नवऱ्याला समजून सांग , तो कुठे आहे ? तो आम्हाला हवाय. असे म्हणून कुटुंबसमोर धमकावत मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला असता तो फुटला.यावरून अवैध वाळू वाहतुकदार, अवैध धंदे चालक व पोलीस यांच्या बातम्या प्रकाशित करणाऱ्या पत्रकारांच्या जीवावर उठले असल्याने असे प्रकार घडत आहे . संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी रवी देशमुख व स पो नि विलास मोरे यांची तात्काळ इतरत्र बदली करण्यात यावी व पोलीसां सोबत घरी आलेले खाजगी व्यक्तीं व वाळू तस्करावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे. अशी मागणी महाराष्ट्र पत्रकार जनसेवा संघातर्फे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह पोलीस अधिक्षकाकडे करण्यात आली आहे. अन्यथा सरनावर बसून पोलीस ठाण्या समोर उपोषण व आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे या निवेदनावर दादासाहेब काळे , सुनिल वैद्य , बाबासाहेब सोनवणे, दुर्गेश आपार , गणेश महाले, रमेश दणके, राधेशाम हिवाळे , हेमंत वाघ यांच्या सह अनेक पत्रकारांच्या सहया आहेत.



# ग्रुप ग्रामपंचायत शेलगाव जानेफळ ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** ग्रुप ग्रामपंचायत शेलगाव जानेफळ गाव शेलगाव येथे वीस एप्रिल 2023 रोजी सायंकाळी 7.30 वाजता ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली या विषयी पोलीस पाटील अमीन सय्यद यांनी नागरिकांना सविस्तर माहिती सांगितली यावेळी सुनील देवकर, रघुनाथ वाघदरे, संदीप जाईबहार, पंडित शेळके, रमेश जातोडे, पद्माकर जातोडे, पांडुरंग मोरे, सुधाकर सावळे, सुनील सावळे, ज्ञानेश्वर वाघदरे, रोहिदास वाघदरे, सुभाष मोहरे, पंडित देवकर, बबन देवकर, अशोक शेळके, गणेश मगरे, राजू मगरे, दत्तू देवकर, विशाल वाघदरे, नवनाथ वाघदरे, नारायण मोरे गावातील नागरिक उपस्थित होते.

# जगतज्योती महात्मा बसवेश्वरांची जयंती उत्साहात साजरी होणार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येथे 22 एप्रिल रोजी अक्षय तृतीयेच्या दिवशी जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची भव्य सार्वजनिक जयंती महोत्सव महात्मा बसवेश्वर महाराज अनुभव मंटप बसवण्णा हिल्स कॉलेज रोड धर्माबाद येथून निघणार असून सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण दहा वाजता रक्तदान शिबिर अकरा वाजता मोटरसायकल रॅली बारा वाजता महाप्रसाद व चार वाजता भव्य शोभायात्रा धर्माबादच्या मुख्य रस्त्याने निघणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. जग ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांनी बाराव्या शतकात समता बंधुता न्याय व लोकशाहीची तत्वे जनमानसात रुजवत अस्पृश्यता अंधश्रद्धा निर्मूलन स्त्री पुरुष समानता या वअशा अनेक परखड विषयावर भाष्य करत वचनांची निर्मिती केली. आज कर्नाटक तेलंगाना आंध्र प्रदेश महाराष्ट्र यासह देशातल्या अनेक कानाकोपऱ्यात बसव भक्तांचा जनसागर अक्षय तृतीयेच्या दिवशी मानवंदना देण्यासाठी जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पूजनाने ही जयंती साजरी केली जाते. देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनीही आपल्या अनेक भाषनाची सुरुवात ओम गुरु बसवलिंगाय नमः म्हणून करतात. जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज चे बाराव्या शतकातील लोकशाही वृद्धिंगत करण्यासाठी केलेल्या अनुभव मंठपाच्या निर्मितीचे उदाहरण अनेक ठिकाणी दिले आहे त्यामुळे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांचा जन्मोत्सव यावर्षी धर्माबाद तालुक्यात 22 एप्रिल रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न होणार आहे यावेळी महा रक्तदान शिबिर व मोटरसायकल रॅलीला युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा असेही जयंती मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे .या जयंती महोत्सवाला अनेक शिवाचार्य यांची उपस्थिती लाभणार असून जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या भव्य पुतळ्याची मिरवणूक मुख्य रस्त्याने पारंपारिक वाद्यांच्या गजरांमध्ये गुरुराज माऊलीच्या जयघोषात होणार असल्याचेही आयोजकाने सांगितलेले आहे .या जयंतीसाठी जयंती मंडळाचे कार्यकर्ते व वीरशैव लिंगायत समाजाचे अनेक पदाधिकारी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिवस रात्र मेहनत घेत आहेत.

# युवासेना परतूर तहसील कार्यालयाला कुलूप लावणार

## अतिवृष्टीने झालेली नुकसान भरपाई अद्यापही नाही

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील अनेक सर्कलसह आष्टी, श्रीष्टी, सातोना या सर्कलमध्ये ही सण २०२२ मध्ये ऑक्टोंबर व नोव्हेंबर महिण्यात अतिवृष्टी झालेली असुन तेथील शेतकरी बांधवांचे अनोतान नुकसान झालेल होत. तसेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरसगट अतिवृष्टी झालेले घोषीत लेले व अतिवृष्टी झालेल्या भागातील शेतकऱ्यांच्या खात्यावर अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी मात्र या घटनेला पाच ते सहा महीण्यांचा कालावधी पाहता पाहता निघुन गेला . अद्यापही अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकर्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याने उध्दव बाळासाहेब ठाकरे गट युवा सेनेचे तालुका प्रमुख गजानन चवडे यांच्यासह परिसरातील शेकडो शेतकरी बांधवां समवेत आज परतूर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आसुन अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ नुकसानाची भरपाई रक्कम जमा करण्यात यावा अन्यता परतूर तहसील कायालयाला शेकडो शेतकर्यां समेवेत कुलुप लावू असा निवेदणावर नमुद करूण भर्भित इसारा दिला आहे. यावेळी युवा सेनेचे तालुका प्रमुख गजानन चवडे तसेच शेतकरी प्रदिप ठोके, रामजी सोळंके, गजानन सोळंके, श्रीरंग मुजमुले, आवधुद उकंडे आदींच्या निवेदनावर सहया आसुन उपस्थित होते.



# अनधिकृतरित्या केलेला चाळीस ब्रास वाळूसाठा महसूलकडून जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** तालुक्यातील धुळे सोलापूर हायवे पासून अंदाजे अर्धा किलोमीटर अंतरावर बारसवाडा जवळील राजस्थानी चौधरी हॉटेलच्यामागे अनधिकृतपणे अंदाजे 40 ब्रास वाळूचा साठा केल्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना दि. 20 रोजी दिसून आला. परिसरात असणारे शेतकरी तसेच ग्रामस्थांना याबाबतीत विचारणा केली असता. कोणी साठवणूक केली याची माहिती मिळून न आल्याने हा साठा जप्त करण्यात आला आहे. याविषयी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिलेली माहिती अशी की, अंबड तालुक्यातील बारसवाडा येथे राजस्थानी चौधरी हॉटेलच्यामागे पाहणी केली असता धुळे सोलापूर हायवे पासून अंदाजे अर्धा किलोमीटर अंतरावर अज्ञात इसमानी अंदाजे 40 ब्रास



इतका वाळूचा साठा केल्याचे दिसून आले. तसेच शेजारील शेतकऱ्यांकडे चौकशी केली असता, हा साठा कोणी केला हे त्यांना माहीत नसल्याने सदर वाळू साठा चोरीला जाऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी विजय राठोड, अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय अधिकारी भाऊसाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली रीतसर पंचनामा करण्यात येऊन जप्त करून शेजारच्या गावातील वाहन चालक यांना तलाठी यांनी विनंती करण्यात येऊन स्वेच्छेने सदरचा साठा तहसील कार्यालयात त्यांच्या वाहनातून वाहतूक करून तहसील कार्यालयात जमा करण्यात आलेला आहे. तसेच हा साठा नियमानुसार सरकारी कामासाठी वरिष्ठांच्या परवानगीने देता येईल.

ही कार्यवाही करतेवेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके नायब तहसीलदार विश्वास धर्माधिकारी, महसूल सहाय्यक अनिल शिरसाठ, तलाठी विठ्ठल गाडेकर, विजय जोगदंड, राम महाले, संतोष जयस्वाल, रमेश कोनेरवार, स्वप्नील खरात, कोतवाल संदीप धारे, मनोज उघडे, सतीश राक्षे, मनिष जिरेकर, सुनील काळुंखे हे उपस्थित होते.

अंबड तालुक्यातील सर्व नागरिकांना तहसीलदार या नात्याने जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, अशाप्रकारे कोणीही अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक, तसेच साठा अथवा उत्खनन करत असेल, किंवा अशा वाहतुकीस व उत्खननास कोणी मदत करत असेल, तर अशा इसमांची नावे प्रशासनाला कळवावीत .नावे कळवणारांची ओळख गुप्त ठेवली जाईल . जेणेकरून अंबड तालुक्यात अवैधरित्या होणारी वाळूची व इतर गौणखनिजाची वाहतूक रोखता येईल .

**– चंद्रकांत शेळके, तहसीलदार**

# अक्षय तृतीयेचा शुभमुहूर्त !!



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**मराठी नववर्षाची सुरुवात झाली पाडव्याला आपण सर्व मराठी बांधवांनी त्याचं खूप मोठ्या उत्साहन आनंदाने स्वागतही केलं त्यानंतर रामनवमी हनुमान जयंती महावीर जयंती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती एकनाथ दोन अनेक उत्साहात आपण सारेजण रममान होऊन गेलो मग वेध लागले ते अक्षतृतीयेचे हा या सणाला खूप मानाचा स्थान दिलेलं आहे वर्ष प्रतिपदा पाडवा विजयादशमी आणि अक्षय तृतीया असे वर्षातील शुभ मुहूर्त तर दिवाळीचा पाडवा हा अर्धा मुहूर्त म्हणून समजला जातो .**

वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय तृतीया आपल्या पुराणातून या सणाचे सुरेख वर्णन केलेले आहे भगवान श्रीकृष्ण या अक्षय तृतीयेचे महत्त्व विशद करताना धर्म सांगतात या दिवशी केलेलं दान होम हवन हे क्षयाला जात नाही. या दिनाच्या दिवशी केलेले दान होम हवन हे छायाला जात नाही या दिनाच्या प्रित्यर्थ केलेले सर्व पुण्य कर्म हे चिरंतन टिकणारे आहे आपले देव आणि आपली पित्र यांच्यासाठी केलेले सत्कर्म हे या तिथीचे अक्षय ठरणारे अविनाशी असे महत्त्वाचे आहे अक्षय तृतीयेचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे म्हणूनच या दिवशी आपल्या मित्रांच्या स्मृती प्रित्यर्थ अन्नदान जलदान वस्त्रदान तसेच पानपोई उघडूनही तहानलेल्या जीवना जलदान करण्याची परंपरा आपल्याकडे आजही कायम आहे.

अक्षय तृतीया म्हणजे त्रेता युगाचा आरंभ तर काहींच्या मते हा कृत्य योगाच्या आरंभ आहे असे मानले जाते तरी उत्तर हिंदुस्थानात मात्र सत्य युगाचा आरंभ दिन म्हणून या दिवसाला विशेष महत्त्वाचे स्थान दिलेले आहे या दिवसाला आखाती किंवा अखिल ती असेही म्हटले जाते दक्षिण हिंदुस्थानात देवीच्या मंदिरातून तर उत्तर हिंदुस्थानातील मथुरा अयोध्या काशी वृंदावन द्वारका बका बकोर नाथ अशा असंख्य मंदिरातून अक्षय तृतीय वसंत उत्सव साजरा केला जातो. गुजरात मध्ये या सणाला अखतरी असे समजले जाते.

जैन धर्मियांमध्ये अक्षय तृतीयेला विशेष असे मानाचे स्थान दिलेले आहे जैन धर्म यांचे आदिनाथ म्हणजेच वृषभ देव यांनी एक वर्ष होऊन अधिक काळ उपवास केलेला होता त्या कालखंडात असणारे हस्ते होणार हसीना पुरचे राजे श्रीराम यांच्या भोज शाळेत त्यांनी हा उपवास उसाचा रस प्राशन करून सोडला त्यामुळे राजाची भोज शाळा अक्षय झालेली होती यावरून त्या दिवसाला अक्षय तृतीया असे नाव पडले अशी जैन धर्मियांची श्रद्धा आहे. अक्षय तृतीयेला आज केवळ भारतातूनच नव्हे तर प्राचीन काळातून हिंदू संस्कृतीत प्रबळ असणाऱ्या ग्रीस बेबोलिया इंडोनेशिया या देशांमधूनही आज त्या ठिकाणी वसंत उत्सव अतिशय आनंदात जल्लोषात साजरा केला जातो विष्णूचा सहावा अवतार परशुराम यांच्या जन्मदिवस अक्षतृतीयेलाच आहे म्हणून या दिवशी परशुराम जयंती ही साजरी केली जाते.

जमदग्नी ऋषी व रेणुका यांचा मुलगा म्हणजे राम आपल्या महान तपश्चर्येतून त्यांनी गणपतीकडून परशु प्राप्त करून घेतली त्यामुळे त्याला पुढे परशुराम असे नाव पडले परशुराम हा विलक्षण पराक्रमी राजा होता धनुर्विद्या त्याचा हात धरणारा योद्धा नव्हता आपल्या धनुर्विद्येच्या सामर्थ्यावर



परशुरामाने बाण मारून समुद्र मागे हटविलेला होता त्यातून त्यांनी कोकण प्रांताची निर्मिती केली त्यामुळेच कोकणात परशुरामाची भूमी असे संबोधले जाते सप्तचिरं जेव्हा पैकी एक असणाऱ्या परशुरामाचे अत्यंत सुंदर मंदिर चिपळूण ला आहे याच मंदिरात परशुरामाची जयंती अत्यंत भक्ती भवन साजरी केली जाते कोकणचा बांधवांचे हे आराध्य दैवत आहे भारतातून हजारोंच्या संख्येने ही मंडळी चिपळूणच्या या जयंती उत्सवात मोठ्या भक्ती भावना श्रद्धेने सहभागी होताना दिसतात या परशुराम जयंतीच्या माध्यमातून या ठिकाणी मोठी यात्राही भरवली जाते. चैत्र शुद्ध तृतीयेला घराघरातून चैत्रगौर भरून बसविली जाते या गौरीचे भक्ती भावाने पूजनही केले जाते चैत्र शुद्ध तृतीयेपासून वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय तृतीया या दिवशी चैत्रगौरीच्या उत्सवाची सांगता केली जाते या संपूर्ण महिन्यात केव्हा अक्षय तृतीयेचे अवचित्य साधून घराघरातून हळदी कुंकवाच्या समारंभाचे आयोजन केले जात असते या कालखंडात स्त्रियांना स्त्रियांचा वापर अतिशय कमी होता हळदी कुंकाच्या माध्यमातून का होईना अनेक स्त्रियांनी एकत्रित यावे त्यांच्या विचारांचे संवर्धन व्हावे हीच मोठी उदात्त संकल्पना यामागे होती गौरीची आरास गौरीची सजावट करून स्त्रिया मोठ्या उत्साहाने एकमेकीला मदत करताना दिसतात घराघरातील अंगणात रांगोळ्या ही सजवून घरामध्ये खूप छान सजावट करण्याची परंपरा देखील आहे या हळदीकुंकवाच्या माध्यमातून घरातील स्त्रियांच्या अंगी असलेल्या कला गुन्हा स्वभाव मिळावा तसेच घराघरातून दिवसभर राबणाऱ्या स्त्रिया मुली या समारंभाच्या माध्यमातून का होईना एकत्रित येऊन आपली मने एकमेकात मोकळी करावी हीच यामागील मोठेच उदात्त संकल्पना होती याचबरोबर समाजातील अनेक स्त्रिया एकत्रित आल्यामुळे त्यांच्यामधील एकोपा सक्य सामंजस्य वाढीस लागते ही देखील या मागची मोठी संकल्पना या काळामध्ये वडीलधारी मंडळीच्या हृदयात होती.

हळदी कुंकवाच्या या निमित्याने गौरी उत्सवाची सांगता अक्षेत रितेश करण्याची परंपरा आजही कायम आहे हळदीकुंकवाच्या या समारंभात घरी येणाऱ्या प्रत्येक स्त्रियांना कच्ची कैरी घालून तयार केलेली डाळ पणे देण्याची पद्धत आहे यामागील संकल्पना देखील मोठी छान आहे उन्हाळ्यातील शरीराचे शहराचे आणि पाण्याचे प्रमाण कमी होते कैरीचे पाणी व गूळ घातलेले हे पणे त्यामुळे पाणी व क्षार याचा समतोल टिकून राहण्यास मदत होते गाडीमध्ये प्रथिनांचे प्रमाण अधिक असते त्यामुळे शक्ती येते क्षार पाणी असा सर्वदृष्टीने समतोल टिकून राहण्यास मदत होते आपल्या प्रत्येक क्षणाच्या उत्सवाच्या माध्यमातून या वडीलधारी मंडळीने खूप बारकाईने अभ्यास केलेला आहे आपल्या या सणातून पूर्वीपासून शास्त्र आणि धर्म यांची सांगड घालून प्रत्येकाचे जीवन आरोग्य कसं संपन्न होईल तसं समृद्ध होईल याचाच विचार सातत्याने केलेला आहे... हो..ना...



## वैशाली कंकाळ लिखित जिगिषा काव्यसंग्रहाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** सुलतानपूर ' येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या शिक्षिका वैशाली कंकाळ यांचा जिगीषा' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला. 'जिगीषा' हा काव्य संग्रह म्हणजे मानवतेचा शोध घेणारा, जीवनमूल्ये, जीवनाबद्दल जिंकण्याची विजयाची इच्छा निर्माण करणारा आहे. वैशाली कंकाळ या संवेदनशील कवयित्री आहेत. त्यांनी आपल्या कवितेला बंधनापासून मुक्त केले आहे, असे प्रतिपादन प्रकाशन सोहळ्याच्या वेळी डॉ. दादा गोरे यांनी केले. यावेळी डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ. कैलास अंभुरे यांनी काव्यसंग्रहावर भाष्य केले. वृषाली श्रीकांत, हबीब भंडारी, संदीप ढाकणे, सुरेखा कंकाळ, मनोहर कंकाळ, सुहास चव्हाण यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन झाले. कवयित्री वैशाली कंकाळ यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी माधुरी चौधरी, सुरेखा कंकाळ, यांच्या अध्यक्षतेखाली कवयित्रींचे संमेलन आयोजित करण्यात आले होते कल्पना निंबोकार, गीतांजली शिंपी, शिल्पा गडकर, नीलिमा पुजारी, सुनीता कपाळे मंगला चौरे, लता गवळी, मंगला वाघमारे, लता बावणे, दिव्यलता चौधरी, सुरेखा बेंद्रे, या कवयित्रींनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन निशा कापडे यांनी केले. तर आभार सुहास चव्हाण यांनी मानले. यावेळी माधुरी सरागे, लक्ष्मीकांत कंकाळ, डॉ. दीपक भावसार, दिलीप क्षीरसागर साईनाथ फुसे, संजय बुचुडे, संजय बिरारे, रुपाली पाटील, निलेश कंकाळ, नंदिनी भावसार आदी उपस्थित होते.

## काव्यप्रदेशातील स्त्रीसाठी अ.भा. मराठी प्रकाशन संस्थेचा उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार

### ॲड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते होणार सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सन २०२२ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांपैकी उत्कृष्ट अश्या पुस्तकांची माननीय परीक्षकांनी पुरस्कारांसाठी निवड केलेली असून हे पुरस्कार आज जाहीर करण्यात आले आहेत. हे सर्व पुरस्कार प्रकाशकांसाठी असून मुखपृष्ठांचे पुरस्कार प्रकाशक व चित्रकार असे दोघांनाही दिले जातात. ह्या अंतर्गत संदर्भ ग्रंथासाठीचा द्वितीय पुरस्कार - काव्यप्रदेशातील स्त्री ह्या ग्रंथासाठी अथर्व पब्लिकेशन, जळगाव ह्यांच्याकरिता युवराज माळी ह्यांना जाहीर झाला असून ह्या ग्रंथाचे लेखक मेहकर येथील प्रसिध्द साहित्यिक किरण शिवहर डोंगरदिवे हे आहेत. कुसुमाग्रज स्मारक नाशिक येथे श्री अशोक कोठावळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या चौथ्या लेखक-प्रकाशक साहित्य संमेलनात रविवार दि. ७ मे रोजी सकाळी १० वाजता मा. श्री. उज्ज्वल निकम, यांच्या हस्ते मा. श्री. रामदास भटकळ व मा. श्री. प्रवीण दवणे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार काव्यप्रदेशातील स्त्री ह्या ग्रंथाचे प्रकाशक युवराज माळी ह्यांना प्रदान केला जाणार आहे. प्रकाशक युवराज माळी यांनी समक्ष उपस्थित राहून पुरस्कार स्वीकारावे असे अ. भा. म. प्रकाशक संघ कार्यकारिणीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे अ भा म प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे हे आहेत. काव्यप्रदेशातील स्त्री हा मराठी समीक्षणातील विलक्षण प्रयोग असून सर्वत्र चर्चेत असलेल्या ह्या ग्रंथाला विदर्भ साहित्य संघ नागपूर, सुर्यकांता पोटे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार अमरावती, जयराम गायकवाड स्मृती समीक्षा पुरस्कार बुलडाणा आणि बहुजन साहित्य संघाचा शाहू फुले आंबेडकर समीक्षा पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 23 एप्रिल ह्या जागतिक पुस्तक दिनाच्या स्वागतासाठी आपण सज्ज असतांना बुलढाणा जिल्ह्यातील लेखकाच्या पुस्तकाची महाराष्ट्रभर घेतली जाणारी दखल ह्यामुळे जिल्ह्यातील साहित्य वर्तुळातून काव्यप्रदेशातील स्त्री चे प्रकाशक आणि लेखक दोघांचेही अभिनंदन होत आहे.

## नितीनकुमार पहुरकार नॅशनल एक्सलन्स राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**शेगाव :** नाशिक येथील ॲग्रो केअर गृप ऑफ कंपनी (एजीसी) या संस्थेच्या वतीने देण्यात येनारा 'नॅशनल एक्सेलन्स अवॉर्ड-२०२३'चा राष्ट्रीय पुरस्कार बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील नितीनकुमार पहुरकर यांना नाशिक येथील द इंस्टीट्यूट ऑफ इंजिनिअर्स येथे सिने अभिनेत्री स्मिता प्रभू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी संचालक डॉ.सुर्या गुंजाळ हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून सिने अभिनेत्री स्मिता प्रभू ,राहुरी कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत्त उच्च अधिकारी डॉ. प्रमोद रसाळ, कृषीभूषण ग्रोवर्स प्रोड्यूसर कंपनीचे चेअरमन भूषण निकम हे होते. कृषी विस्तार व प्रशिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी, गटशेती व विषमुक्त शेतीचा प्रचार आणि प्रसार करुन शेकडो शेतकऱ्यांना प्रशिक्षीत करणारे नितिनकुमार पहुरकार बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील निवासी आहेत.

नितीनकुमार यांनी विवेकानंद कृषी महाविद्यालय येथून 'कृषी पदवी' पूर्ण केली आहे.वडिलांचे छत्र हरपलेल्या नितिनने मेहनत जीद्द आणि शिक्षण यांचा त्रीवेणी संगम साधत या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे.सुरवातीच्या काळात शिकवणी वर्ग घेऊन घराची आर्थिक धुरा सांभाळत पुढील शिक्षण मात्र सुरुच ठेवले 'एमबीए' मध्ये पदव्युत्तर पदवी आणि कायद्याचे शिक्षण(LLB) देखील घेतले. शासकीय तसेच नामांकित कंपन्यांमध्ये प्रशिक्षक म्हणुन कामगीरी सुद्धा बजावली आहे. या शिक्षणाचा आणि अनुभवाचा उपयोग कृषी व कृषी निगडित प्रश्नांवर करायचा असल्याचं त्यांनी आपल्या मनोगतामधून प्रकट केले. नितीनकुमार यांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आल्याने सर्वच स्थरातून त्यांचे कौतूक केल्या जात आहे.

## बुलढाणा जिल्ह्यातील अनेक गावांना टँकरने पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यात एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यातच पाणी टंचाईची तीव्रता वाढली आहे. कमी अधिक दोन लाख ग्रामस्थांची तहान कृत्रिम उपाय योजनांद्वारे भागविली जात आहे. यामुळे ग्रामीण राहिवासीयांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.जिल्ह्यातील तेरा पैकी बहुतेक तालुक्यातील गाव खेड्यातील तापमान ४० ते ४२ डिग्री सेल्सियस च्या दरम्यान पोहोचले आहे. मलकापूर, मोताळा, खामगाव, शेगाव, नांदुरा, जळगाव, संग्रामपूर या घाटाखालील उन्हाची तीव्रता जास्त आहे.

यामुळे पावसाळ्यात कोसळधार पाऊस पडूनही आणि वेळोवेळी अवकाळी पावसाने हजेरी लावूनही एप्रिलच्या दुसऱ्या पंधरवड्यातच पाणी प्रश्न पेटल्याचे चित्र आहे.

